दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२०० | सोमवार दि.१७ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सामाजिक घडी कोसळण्याची भीती!

एका अविवाहित युवकाने शरद पवार यांना लिहिलेल्या पत्राने गंभीर सामाजिक समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले गेले आहे. प्रयत्न करूनही विवाह होत नाही, तो जमवून देण्याचे साकडे त्याने शरद पवारांना पत्राद्वारे घातले आहे. त्याचे ते पत्र माध्यमात प्रसिद्ध झाले असून चर्चेचा विषय ठरले आहे.

# आता गूळ कारखाने देखील येणार कायद्याच्या कक्षेत

मुंबई । प्रतिनिधी

**साखर कारखान्यांप्रमाणे आता गूळनिर्मिती करणाऱ्या कारखान्यांवरही निर्बंध आणून या उद्योगाला कायद्याच्या कक्षेत आणले जाणार आहे. गूळ कारखान्यांसाठी कायदा करताना यामध्ये शेतकऱ्यांना 'एफआरपी', कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि किमान वेतन, स्वच्छता यासंबंधीचे नियम लागू केले जाणार आहेत. शिवाय, गुऱ्हाळघरे चालू करण्यासाठी ऊस कारखान्यांप्रमाणे गूळ कारखान्यांनाही परवानगी घ्यावी लागणार आहे. त्यासाठी सहकार विभागाने साखर आयुक्तांना अहवाल तयार करण्यास सांगितले आहे.**



राज्यात छोट्या गुऱ्हाळघरांच्या नावाखाली अनेक मोठे कारखाने सुरू झाले आहेत. राज्यातील छोट्या गुऱ्हाळघरांकडे अजूनही शेतकऱ्यांकडून चालविला जाणारा छोटा व्यवसाय किंवा शेतीपूरक उद्योग म्हणून पाहिले जाते. त्यामुळेच या गुऱ्हाळघरांना विविध नियमावलीतून शासनाने सूट दिली आहे. मात्र, मोठ्या क्षमतेने उभारलेल्या गूळ कारखान्यांकडून उसाची खरेदीदेखील मोठ्या प्रमाणावर केली जात आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना पुरेसा ऊस मिळत नसल्याने त्याचा साखर उत्पादनावर परिणाम होऊ लागला आहे. विशेष म्हणजे गाळप कधी सुरू करायचे, याबाबत साखर कारखान्यांना साखर आयुक्तांकडून परवानगी घ्यावी लागते. तसेच, शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### चिराग पासवान यांची उपमुख्यमंत्रिपदी वर्णी?

पाटणा: निवडणुकीत एनडीएला दणदणीत विजय मिळाल्यानंतर बिहारचे पुढील मुख्यमंत्री कोण होणार, यावर जोरदार चर्चा सुरू असतानाच लोजप (रामविलास) प्रमुख चिराग पासवान यांनी जद (यू) प्रमुख नितीशकुमार यांची भेट घेतली, ज्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. एकेकाळचे नितीश यांचे कट्टर विरोधक असलेल्या पासवान यांनी आपण केवळ जद (यू) प्रमुखांचे अभिनंदन करण्यासाठी गेलो होतो, असे म्हटले असले, तरी त्यांच्या पक्षाच्या दमदार कामगिरीनंतर ते उपमुख्यमंत्री पदावर डोळा ठेवून असल्याची चर्चा सुरू झाली आहे. पासवान यांनी पोस्ट केलेल्या छायाचित्रांमध्ये नितीशकुमार त्यांचे ते उत्साहात स्वागत करताना दिसत आहेत आणि दोघेही नेते जुने कटू संबंध आणि तणावपूर्ण इतिहास मागे सोडून कॅमेऱ्यासमोर हसताना दिसत आहेत.

### मुंबईत होणार आता प्राण्यांसाठी स्मशानभूमी

मुंबई : ठाणे शहरात पाळीव प्राणी म्हणजे घरातल्या सदस्यांसारखेच असतात. आता त्यांच्या अखेरच्या प्रवासासाठी ठाण्यात एक चांगले आणि सन्मानाचे ठिकाण तयार झाले आहे. आजार, अपघात किंवा म्हातारपणामुळे हे निष्ठावान साथीदार वारल्यास, त्यांच्यावर योग्य पद्धतीने अन्त्यसंस्कार करण्याची जी अडचण होती, ती आता संपली आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या पुढाकाराने माजीवडा (ठाणे) येथे महाराष्ट्रातील पहिली पाळीव प्राणी गॅस स्मशानभूमी उभी करण्यात आली आहे. या ठिकाणी पाळीव प्राण्यांसाठी खास स्मशानभूमी बांधून, त्यांच्या कुटुंबीयांना भावनिक आधार देण्याचा छान विचार प्रत्यक्षात आला आहे.

### १ कोटी महिलांना योजनेतून वगळणार?

मुंबई : महाराष्ट्राच्या लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसीची अंतिम मुदत जवळ येत आहे. अंदाजे २३.५ दशलक्ष लाभार्थ्यांपैकी १ कोटींहून अधिक महिलांची अजूनही ई-केवायसी प्रलंबित आहे. परिणामी, लाखो महिलांना या योजनेतून वगळण्याचा धोका आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू झालेल्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेने लाभार्थ्यांना मासिक १,५०० देयके जाहीर केली. या योजनेअंतर्गत एकूण अंदाजे २३.५ दशलक्ष लाभार्थ्यांनी नोंदणी केली आहे. तथापि, महिला आणि बालविकास विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, आतापर्यंत फक्त १ कोटी ३० लाख महिलांनी त्यांचे ई-केवायसी पूर्ण केले आहे. याचा अर्थ असा की १ कोटींहून अधिक लाभार्थी अजूनही ई-केवायसी प्रलंबित आहेत. ई-केवायसी पूर्ण करण्याची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर निश्चित करण्यात आली आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवार अमित शहा यांच्या भेटीला

नवी दिल्ली : दिल्लीत अजित पवार यांनी रविवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. त्यानंतर राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना सुरुवात झाली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास अर्धा तास चर्चा झाली. या चर्चेदरम्यान इतर विषयांसह पार्थ पवार प्रकरणीही चर्चा झाल्याचे समजते. विरोधी पक्षांनी पार्थ पवार यांच्याशी संबंधित एका कथित जमीन प्रकरणाशी जोडले आहे. विरोधकांच्या मते अजित पवार हे पार्थ पवारांच्या जमीन प्रकरणाविषयी खुलासा करण्यासाठी शहांना भेटले असावेत, अशी चर्चा आहे. या भेटीत अजित पवार यांनी या प्रकरणातील खुलासा अमित शाह यांच्यासमोर केला असल्याचे सूत्रांनी सांगितले.


### नवजात मुलाला ५ लाखांना विकण्याचा प्रयत्न

मुंबई : मुंबईतील शिवाजीनगर गोवंडी भागात नवजात मुलाला ५ लाख रुपयांना विकण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका महिलेसह पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोवंडी येथील एका नर्सिंग होममध्ये २१ वर्षीय अविवाहित महिलेने अकाली बाळंतपण केले होते. कार्यकर्त्या बिनू वर्गीस यांनी नवजात बाळ विकल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर देवनार पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक कैलास सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील एक पथक तपास सुरू करण्यासाठी नर्सिंग होममध्ये पोहोचले. नर्सिंग होमचे मालक डॉ. कयामुद्दीन खान, कर्मचारी अनिता पोपट सावंत, बाळाची आई, एजंट शमा आणि बाळ खरेदी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दर्शना यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नर्सिंग होममधील आणखी काही कर्मचारी यात सहभागी असल्याचा संशय आहे. या प्रकरणाची पुढील चौकशी सुरू आहे.

# बीड जिल्ह्यात तब्बल २ लाख १३ हजार शेतकरी फार्मर आयडी पासून वंचित

बीड । प्रतिनिधी

**माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीतील आकडेवारीनुसार, बीड जिल्ह्यात एकूण ७,३७,६१० शेतकऱ्यांपैकी तब्बल २,१३,०५२ शेतकरी फार्मर आयडी नोंदणीपासून वंचित असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. ही माहिती माहिती अधिकार कार्यकर्ते निलेश चाळक यांनी दाखल केलेल्या अर्जावर जिल्हाधिकारी कार्यालयाने दिली आहे. त्यामुळे आत्ता जिल्हा प्रशासनाने फार्मर आयडी काढण्यासाठी जनजागृती करण्याची मागणी माहीती अधिकार कार्यकर्ते निलेश चाळक यांनी केली आहे.**




बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, फार्मर आयडीसाठी एकूण नोंदणी व्हायच्या शेतकऱ्यांची संख्या ही ७,३७,६१०, तर नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांची संख्या ही ५,२४,५५८ इतकी आहे. यावरून फार्मर आयडी पासून वंचित शेतकरी २,१३,०५२ असल्याचे स्पष्ट होते. बीड जिल्ह्यात ७१.१८ % टक्के शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केली आहे. जिल्ह्यात २ लाखांहून अधिक शेतकरी हक्काच्या फार्मर आयडी शिवाय ▶▶ पान २ वर


**तालूकानिहाय संख्या**

अंबाजोगाई ५८८२१, आष्टी ८९८३६, बीड १०१०३०, धारूर ३५९६५, गेवराई ११६९३९, केज ८६७१०, माजलगाव ६२४४३, परळी ५६७२७, पाटोदा ५२२२४, शिरूर ४९५००, वडवणी २७४१५ अशी एकूण ७३७६१० एवढी संख्या आहे.

**पात्र शेतकऱ्यांची संख्या**

अंबाजोगाई ४२३०२, आष्टी ६६१३८, बीड ७३४८७, धारूर २६७९४, गेवराई ७७०४१, केज ६५०२१, माजलगाव ४७२१२, परळी ३९९३८, पाटोदा ३३८७७, शिरूर ३३०९३, वडवणी १९५९५ अशी एकूण ५२४५५८ एवढी संख्या आहे.

## विद्यार्थी सहलींसाठी एसटी महामंडळाकडून पन्नास टक्के सवलत



ठाणे । प्रतिनिधी

मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावर्षी शालेय आणि महाविद्यालयीन सहलींसाठी नवीन राज्य परिवहन बसेसची घोषणा केली आहे. तसेच विद्यार्थ्यांना परवडणारा आणि सुरक्षित प्रवास करण्यासाठी भाड्यात ५० टक्के सवलत दिली आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या २५१ डेपोमधून दररोज सुमारे ८०० ते १,००० नवीन बसेस शाळा आणि महाविद्यालयांना उपलब्ध करून दिल्या जातील, असे सरनाईक यांच्या कार्यालयाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

विद्यार्थ्यांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवासासाठी दिवाळीच्या सुट्टीनंतर, विद्यार्थी शैक्षणिक सहलींसाठी उत्सुकतेने वाट पाहतात आणि राज्य सरकार शालेय ▶▶ पान २ वर

# ज्यांच्या सभेला खुर्च्या रिकाम्या त्यांचे सरकार

## बिहार निवडणुकांवरुन उध्दव ठाकरेंचे भाजपवर टीकास्त्र

मुंबई । प्रतिनिधी

बिहार निवडणुकीच्या निकालावर उद्धव ठाकरे म्हणाले की, आपले मुख्यमंत्री म्हणाले की जो जीता वही सिकंदर, पण सिकंदर बनण्यामागचे रहस्य आजपर्यंत कोणी समजू शकलेले नाही. बिहारच्या निवडणुकीत जे जिंकले त्यांचे अभिनंदन. पण, एका गोष्टीचे मला आश्चर्य वाटते की तेजस्वी यादव यांच्या सभेला जो मिळणारा प्रचंड प्रतिसाद होता. मग तो प्रतिसाद खरा होता की एआयने तयार केलेली माणसे होती, हे आता



कळेना. म्हणजे ज्यांच्या सभेला अलोट गर्दी होते, त्यांचे सरकार न येता ज्यांच्या सभेला खुर्च्या रिकाम्या असतात त्यांचे सरकार येते. या नवीन लोकशाहीतील हे गणित कळण्याच्या पलिकडचे आहे, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी टीका केली.

नुकत्याच पार पडलेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकीत एनडीएला २०२ जागा मिळाल्या, तर महाआघाडीला केवळ ३५ जागांवर समाधान मानावे लागले आहे. त्यामुळे महाआघाडीला मोठा धक्का बसला आहे. बिहार निवडणुकीच्या निकालावर आता शिवसेना उध्दव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधत ▶▶ पान २ वर

# बीडच्या माजी मंत्र्याचा पुतण्या भाजपात

## अजित पवारांना धक्का तर भाजपाला बीड पालिकेत मोठी संधी

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ.सारिका क्षीरसागर यांनी छत्रपती संभाजीनगर येथे भाजपात रविवारी (दि.१६) प्रवेश केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तसेच राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला.**



**क्षीरसागर दाम्पत्याने घेतलेला निर्णय ऐन निवडणुकीच्या तोंडावर अजित पवारांसाठी मोठा धक्का मानला जात आहे. दुसरीकडे डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या रूपाने आणि पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वात भाजपाला प्रथमच बीड पालिकेत मोठी संधी उपलब्ध झाली आहे.**

संभाजीनगर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण व पशुसंवर्धन ▶▶ पान २ वर

## एआय तंत्रज्ञानामुळे देशात २ कोटी नोकऱ्या धोक्यात

मुंबई । प्रतिनिधी

भारतातील मध्यमवर्गीय रोजगाराला मोठा फटका बसू शकतो, असा गंभीर इशारा आंतरराष्ट्रीय आर्थिक तज्ज्ञांनी दिला आहे. देशातील रोजगार बाजारात सध्या ज्या प्रकारचे बदल होत आहेत, त्यातून सुमारे २ कोटी नोक-या पुढील काही वर्षांत गमावल्या जाऊ शकतात, असे विश्लेषकांचे मत आहे. हा धक्का आर्थिक मंदीमुळे नव्हे तर जागतिक व्यापारातील अस्थिरता, एआय तंत्रज्ञानाचा वेगाने वाढणारा वापर आणि कंपन्यांनी खर्च कपातीसाठी केलेल्या मोठ्या बदलांमुळे येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मारसेल्स इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्सचे संस्थापक आणि वरिष्ठ ▶▶ पान २ वर

# एक पुतण्या राष्ट्रवादीत दुसरा भाजपात काका जयदत्त अण्णा द्विधा मनस्थितीत







बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिकेवर गेल्या अनेक वर्षापासून क्षीरसागर कुटुंबीयांची एक हाती सत्ता होती, मात्र मागील पंचवार्षिक निवडणुकीमध्ये या सत्तेला तडे गेले त्यावेळी एका पुतण्याने बंड पुकारले. त्यानंतर आता दुसरा पुतण्या याने राष्ट्रवादीतून थेट भाजपात प्रवेश केला. काका माजी ▶▶ पान २ वर

**अनेकांनी उमेदवारी नाकारली**

योगेश क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर नगरपालिका निवडणुकीमध्ये अनेक प्रभागातील उमेदवारांनी भाजपच्या चिन्हावर निवडणूक नको म्हणून उमेदवारी नाकारली. कोणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट तर कोणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला. विशेष म्हणजे मुस्लिम उमेदवारांची संख्या अधिक आहे. त्यातच डॉक्टर भारतभूषण क्षीरसागर यांचे निकटवर्तीय किशोर काळे यांनी देखील सोडचिठ्ठी देत शरद पवार गटात प्रवेश केला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६४.५० क्विंटल | २,३६२ | ३,००० | २,६२७ |
| ज्वारी/हायब्रिड: ४७.५० क्विंटल | २,५०० | ४,१५१ | ३,०४७ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर: ८.५० क्विंटल | ६,५६१ | ६,५६१ | ६,५६१ |
| उडीद: ३.०० क्विंटल | ४,६०० | ४,६०० | ४,६०० |
| बाजरी: ४२.५० क्विंटल | २,१०० | २,९६० | २,७५३ |
| मुग: ०.५० क्विंटल | ५,३०१ | ५,३०१ | ५,३०१ |
| सोयाबीन: ८७.०० क्विंटल | ४,४५० | ४,६५० | ४,५८७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,५०० | ६,९०० | ६,२०० |

# बिहार निवडणुकीत महिलांना पैसे वाटण्यासाठी जागतिक बँक निधीतून १४ हजार कोटी घेतले

पाटणा । वृत्तसंस्था

**बिहार विधानसभा निवडणुकांसाठी आचारसंहिता लागू होण्याच्या एक तास आधी १४ हजार कोटी रुपये काढून राज्यातील १.२५ कोटी महिलांना वाटण्यात आले. केंद्र सरकारने जागतिक बँकेकडून दुसऱ्या प्रकल्पासाठी निधी घेतला घेतला आणि तो महिला मतदारांना वाटला, असा गंभीर आरोप जन सुराज पक्षाचे प्रवक्ते पवन वर्मा यांनी केला आहे.**

बिहार विधानसभा निवडणुकीत पूर्वश्रमीचे निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पक्षाचा नामुष्कीजनक पराभव झाला आहे. या निवडणुकीत सर्वात आधी मैदानात उतरलेल्या या पक्षाची पाटी कोरी राहिला. बिहार निवडणूक निकालाबाबत वृत्तसंस्थेशी बोलताना



पवन वर्मा म्हणाले की, बिहार विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत १.२५ कोटी महिला मतदारांच्या खात्यात १० हजार रुपये हस्तांतरित करण्यात आले होते. सध्या बिहारमधील सार्वजनिक कर्ज ४,०६,००० कोटी आहे. दररोज व्याज ६३ कोटी आहे आणि खजिना रिकामा असल्याचा दावा केला. वर्मा यांनी असा दावा केला की राज्यातील महिलांना देण्यात येणारे १० हजार रुपये हे जागतिक बँकेकडून ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# सामाजिक घडी कोसळण्याची भीती !

एका अविवाहित युवकाने शरद पवार यांना लिहिलेल्या पत्राने गंभीर सामाजिक समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले गेले आहे. प्रयत्न करूनही विवाह होत नाही, तो जमवून देण्याचे साकडे त्याने शरद पवारांना पत्राद्वारे घातले आहे. त्याचे ते पत्र माध्यमात प्रसिद्ध झाले असून चर्चेचा विषय ठरले आहे. प्रसंगी आपण पत्नीच्या घरी राहायलादेखील तयार आहोत, तिच्या घरी चांगले काम करून उत्तम संसार करण्याची हमी देण्यासदेखील तयार आहोत, असे त्याने सांगितल्याचे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. अनेक युवकांनी याआधीही असा प्रयत्न केला आहे.


एका युवकाने आमदारांना साकडे घातल्याची ध्वनिफित फिरली होती. लग्न जमत नसलेल्या युवकांनी नवरदेवाच्या वेषात तीन-चार वर्षांपूर्वी सोलापूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. तोदेखील गाजला होता. विशेषतः ग्रामीण भागातील युवकांचे विवाह न जमणे ही खोलवर मुरत जाणारी समस्या बनत आहे. या समस्येत जाणत्यांनी लक्ष घातले नाही तर एकप्रकारच्या सामाजिक अस्वास्थ्याला आणि असमतोलाला समाजाला सामोरे जावे लागण्याचा धोका नाकारला जाऊ शकेल का? कोणी वेगळ्या वाटेने त्याकडे लक्ष वेधले तर त्या त्यावेळी तात्पुरती चर्चा होते. पण त्यावर घुसळण, चिंतन आणि मंथन घडल्याचे आढळत नाही. या बदलाची अनेक कारणे सांगितली जातात. मुलांच्या तुलनेत मुलींचे कमी प्रमाण असे कारण लगेच पुढे केले जाताना आढळते. त्यात तथ्य असू शकेल. तथापि या समस्येचा चौफेर विचार करण्याची गरज आहे. परस्परांकडून वाढत्या आणि जाणत्यांच्या मते काहीशा अवास्तव अपेक्षा हा चिंतनाचा मुद्दा ठरावा. दिसण्याची, पगाराची, राहणीमानाची तुलना सर्रास केली जाताना आढळते. शहरी आणि ग्रामीण भागाप्रमाणे अपेक्षा बदलतात इतकाच काय तो फरक. उदाहरणार्थ, मुलगा शेतकरी नको, पण त्याच्याकडे शेती पाहिजे आणि मुलगी शेतात काम करणार नाही या दुटप्पी अपेक्षेचा मुले आणि त्यांच्या पालकांनी कसा सामना करावा? उच्च शिक्षण आणि मग नोकरी यामुळे मुलांचे स्थैर्य आणि स्थिरता प्राप्त होण्याचे वय वाढत जाते. मुलांच्या अपेक्षांमध्येही असाच गोंधळ आढळतो. मुलगी शिकलेली पण नोकरी न करणारी हवी असते. पुरुषी समाज परंपरेप्रमाणे अप्रत्यक्षपणे तिने डोके चालवू नये, असेही त्यांना म्हणायचे असू शकेल. हे कसे शय होऊ शकेल? ही वानगीदाखलची कारणे असू शकतील. पण खोलवर विचार केला तर अत्यंत क्षुल्लक कारणांवरूनदेखील ठरलेले विवाह मोडतात किंवा विवाहपश्चात काहीच दिवसात काडीमोड घेण्याची भाषा एकमेकांना ऐकवली जाते. शहरी भागातील युवक अनेक महिला करत असलेल्या कायद्याच्या गैरवापराकडे अंगुलीनिर्देश करतात. याच कारणामुळे काही युवकांनी केलेल्या आत्महत्या चर्चेचा विषय ठरल्या होत्या. अशा विविध कारणांचा उहापोह यानिमित्ताने व्हायला हवा. कारण कारणे कितीही आणि कोणतीही असली तरी वय उलटून गेले तरी विवाह न होणे हे नैराश्याचे एक प्रमुख कारणदेखील मानले जाते. त्याकडे मानसोपचारतज्ज्ञ समाजाचे लक्ष वेधायचा प्रयत्न करत आहेत.

कोणी कानोसा घेतला तर घरोघरी वयाची किमान तिशी उलटलेली परंतु विवाह न जमलेली मुले आणि मुली आढळतील. असे का घडत आहे यावर मुला-मुलींच्या पालकांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. विवाह संस्था एकप्रकारे कुटुंब संस्था आणि समाजाचा पाया आहे. तीच कोसळली तरी कुटुंब संस्था पर्यायाने सामाजिक घडीदेखील कोसळेल. असे झाले तर त्याचे भीषण परिणाम समाजालाच भोगावे लागतील. तसे होणे कोणालाही परवडणारे नाही. यावर तडजोड हा एक उपाय मानसतज्ज्ञ सुचवतात. संबंधित सर्वच घटकांनी तडजोडीची तयारी दाखवली तरी या समस्येचा ताण थोडातरी हलका होण्याच्या शयतेकडे जाणत्यांचे लक्ष वेधतात. शरद पवार यांना लिहिलेले पत्र असे अनेकार्थांनी गंभीर मानले जायला हवे. शरद पवार जाणते नेते आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रेरणादायी मानले जाते. त्यांच्याभोवती विचारवंतांचे वर्तुळ असते. या समस्येवर जाणत्यांना एकत्र आणण्याची आणि समग्र विचारांची सुरुवात करण्याचे त्यांनी निमित्त ठरावे आणि परिस्थितीतून मार्ग काढण्याची प्रेरणा ठरावे अशीच विवाहेच्छुक तरुण-तरुणींची अपेक्षा असेल.

# परळी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार संध्या देशमुख यांचे नाव जाहीर

**परळी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाची परळी काल पत्रकार परिषद खा. सोनवणे यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी, पक्षाचे निरिक्षक नरेंद्र काळे, प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड , नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दीपक देशमुख,माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख, जीवनराव देशमुख, उत्तम माने,तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, अँड.माधव जाधव शहराध्यक्ष सय्यद फिरोज आदींची उपस्थिती होती. दरम्यान यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे यापूर्वीचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोणाच्या ताब्यात आहे कसा आहे कुणाला सांगण्याची गरज नाही. दरम्यान लोकसभेला सर्वांनी काम केल्याचे कार्यकर्त्यांचे कौतुक खासदार बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी प्रभाग क्रमांक सहा खुल्या प्रवर्गामधून दीपक रंगनाथ देशमुख, प्रभाग क्रमांक सात खुल्या प्रवर्गामधून



वैजनाथ नागनाथ धंपलवार प्रभाग क्रमांक तीन मधून हासिना जब्बार सय्यद नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्याताई देशमुख यांची नावे यावेळी जाहीर करण्यात आली. परळीतून लोकसभेला मोठ्या मताधिक्याने मतदान झाले असून विधानसभेत अपघात वगळता दहशत वगैरे असल्यामुळे चांगले यश मिळू शकले नाही. महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकत्र निवडणूक लढू, महाविकास आघाडीत कुणी वेगळे लढत असेल तर त्याची मनधरणी करून एकत्रित लढण्याचा प्रयत्न करणारा असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. परळी तालुका व बीड जिल्हा शरद पवारांना मानणारा आहे.जनतेने साथ द्यावी आणि २ डिसेंबरला मतदान करून निवडून द्यावे, असे आवाहन यावेळी पत्रकार परिषदेत संबोधन करताना खासदार बजरंग सोनवणे केले.

# भाजपचे कार्यालय कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा व प्रेरणेचे केंद्र बनेल-ना.पंकजा मुंडे

## छ. संभाजीनगर येथे भाजपच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थाटात लोकार्पण

**छ. संभाजी नगर । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्षाचा पाया हा संघर्षातूनच उभा आहे. अटलजींनी त्या काळामध्ये ''ना हार मे, ना जीत मे, ना भयभीत किंचित में'' असे म्हणत ही संघर्षाची बीजं पेरली. त्या संघर्षमय वाटचालीला नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून यश मिळवून देत सुवर्ण सुवर्णकाळ आणला आहे असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी केले.**

भारतीय जनता पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयाचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. त्यावेळी ना



पंकजाताई मुंडे बोलत होत्या. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी भारतीय जनता पक्षाच्या संघर्षातून सुवर्णकाळाकडे झालेल्या वाटचालीची थोडक्यात प्रभावी मांडणी केली. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की,भारतीय जनता पक्षाने त्या दशकांमध्ये पक्ष वाढीसाठी मोठा संघर्ष केला. मात्र आज तोच पक्ष संपूर्ण भारतात यशस्वी झालेला आहे. त्या दशकातील पक्ष वाढीसाठी खस्ता खाल्लेल्या सर्व नेत्यांचे हे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खरे करून दाखवले आहे. बिहारमध्येही आपल्याला प्रचंड यश मिळाले आहे. आता कोणतेच राज्य असे राहणार नाही जिथे भाजपाची पूर्ण सत्ता नसेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातूनही भाजपाला तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपद मिळाले आहे. प्रत्येक कार्यकर्त्याचे स्वप्न होते की तिसऱ्यांदा भाजपचा मुख्यमंत्री झाला पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांनी ते पूर्ण केले आहे. आज प्रत्येक जिल्ह्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचे कार्यालय उभी राहत आहेत. ही कार्यालय केवळ कार्यालये न राहता ती निश्चितच प्रत्येक कार्यकर्त्याला ऊर्जा देणारी केंद्रे होणार आहेत. मराठवाड्यातील एक कार्यालय भाजप कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा केंद्र होणार असून या ठिकाणाहून प्रत्येकाला निश्चित ऊर्जा मिळेल भाजपा रुजवण्यासाठी वाढवण्यासाठी त्या दशकातील आपल्या प्रमोद महाजन असो किंवा मुंडे साहेब असो यांनी पक्षाच्या बाबतीत पाहिलेले स्वप्न पूर्ण होत आहे याचा प्रचंड आनंद होत आहे. येणाऱ्या काळात नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषदांमध्येही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आपल्याला भरघोस यश मिळवायचे आहे. त्यासाठी सर्वांनी काम कामाला लागावे असे आवाहनही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले.

# पान ६ वरून...

### अजितदादा गटाची मोडतोड

हा झालेला बदल हा अजितदादा गटाला मारक ठरणार असून बीड शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा गटाची पिछेहाट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ऐनवेळी अजितदादा गटामध्ये झालेली ही मोडतोड आ. संदीप क्षीरसागर यांच्या पथ्यावर पडत असून आमदार संदीप क्षीरसागर बीड नगरपालिका निवडणूक कुठल्याही परिस्थितीत जिंकायचीच अशा तयारीत आहेत. नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोणीही असला तरी त्यांनी ऐनवेळी आपले पत्ते ओपन करायला सुरुवात केली असून माजी आ. सय्यद सलीम यांच्यासारखा मुरब्बी राजकारणी आ. संदीप क्षीरसागर यांच्या सोबत असल्याने ते राजकारणात यशस्वी होत आहेत. बीड नगरपालिका संदीप क्षीरसागर यांच्या ताब्यात आली तर आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत याचे परिणाम दिसून येणार आहेत. दरम्यान आ. संदीप क्षीरसागर यांनी नगरपालिकेसह जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची तयारी ही पूर्ण करून ठेवली असून त्यांचे नेमके काय चालले आहे. हे बाहेर येत नसल्याने अनेक लोक आ.संदीप क्षीरसागर यांना मुरब्बी राजकारणी समजत आहेत. शेवटी क्षीरसागर घराण्याचा वारस म्हणून संदीप क्षीरसागर आगामी काळात पुढे येत असल्याने कोणीतरी क्षीरसागर आपल्या सोबत पाहिजे या हेतूने अनेक क्षीरसागर घराण्याचे समर्थक आ. संदीप क्षीरसागर यांच्या संपर्कात असून आगामी काळात आ. संदीप क्षीरसागर नगरपालिका सह जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूकीत चांगले यश मिळवतील अशी चर्चा बीड शहरात चालू आहे. बीड शहर हे कुठल्याही जाती धर्माच्या नावावर निवडणुका लढण्यासाठी सकारात्मक नाही तर आपली कामे कोण करतो आणि शहराचा विकास कोण करणार. या मुद्द्यावर लोक मतदान करतात.आ. संदीप क्षीरसागर यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये ही बरीच कामे मार्गी लावल्याने आणि त्यांची आडवणूक होत असल्याची सर्वांना माहिती असल्याने आगामी काळामध्ये जर नगरपालिकेमध्ये आ.संदीप क्षीरसागर यांचा एकहाती कारभार राहिला तर ते शहराचा कायापालट करतील .असा विश्वास नागरिकांना असल्याने सर्व जाती धर्माचे लोक आ. संदीप क्षीरसागर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील अशी शक्यता सध्या तरी दिसत आहे.

----------------

### आरशान पठाणचे दमदार

बीडच्या गोलंदाजांनी दोन्ही डावात ईस्ट झोनला पूर्णपणे नामोहरम केले. कृष्णा सचिन गायकवाडने पहिल्या डावात ६ षटकांत ३ मेडनसह ११ धावांत ४ विकेट घेतल्या, तर दुसऱ्या डावात १०.५ षटकांत ६ मेडनसह २२ धावांत पुन्हा ४ विकेट घेतल्या. कुणाल वाघने दोन्ही डावात मिळून ७ विकेट घेतल्या, तर रोहित लोणकेने ५ बळी घेत उत्कृष्ट गोलंदाजी केली. ईस्ट झोनकडून मल्हारने एकहाती लढत देत ५ विकेट घेतल्या. बीडने हा सामना डावाने व २७० धावांनी जिंकत स्पर्धेत भव्य सुरुवात केली असून आगामी सामने अधिक रोमांचक होण्याचे संकेत दिले आहेत. या प्रभावी प्रदर्शनाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भारत भूषण क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, तसेच महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरिफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूड, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे आणि पठाण शाहरुख,प्रशिक्षक अझहर सर संजय धस यांनी संघातील सर्व खेळाडूंचे अभिनंदन व शुभेच्छा दिल्या आहेत.

----------------

### आ.विजयसिंह पंडित यांनी

घोडके, प्रिती दाभाडे, सिमा हुंडे यांच्यासह समाधान मस्के, रवि पवार, बाबुराव बेद्रे, राम बेद्रे, शंतनू परदेशी, रवि सुतार, महेश पंडित, संतोष खंडागळे, दादा बेद्रे, किशोर खंडागळे, अभिजीत तौर, स्वप्नील वाडकर, आकाश गोरे, जिजा पंडित, अमोल दावडकर, किशोर बेद्रे, अजय माने, किरण ढवारे, सखाराम गोरे, नितीन ढवारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

----------------

### राष्ट्रीय महामार्गसाठी

निगरगट्ट अधिकारी यांनी टोलवाटोलवी करत काहीच कारवाई केली नाही, म्हणून दिलीप शास्त्री सुलाखे व ईतर १५० शेतकर्यांनी उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद न्यायालयात २०२३ मावेजा मिळावा म्हणून याचिका दाखल केली, त्या याचिकेची निकाल शेतकर्यांच्या बाजुने लागला, तरीही मावेजा न दिल्याने आवमान याचिका क्रं २७७/२०२४ रिट याचिका क्रमांक ८०८८/२०१९ मध्ये दिलीप विश्वंभर सुलाखे विरुध्द युनियन ऑफ इंडिया ( भारत संघ) खंडपीठ नितीन बी, सुर्यवंशी आणि वैशाली पाटील -जाधव न्यायमूर्ती यांनी दि, १३ नोव्हेंबर २०२५ रोजी आदेश देत सहा आठवड्यात शेतकर्यांना मावेजा द्यावा अशा आदेश केला, यावेळी शेतकर्यांच्या बाजुनी उच्च न्यायालयात साईसागर अंबिलवादे, वकील उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी परखड बाजु मांडल्याने शेतकर्यांना मावेजा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, या निकाल नंतर साई बाबा मंदिर तांदळा येथे साईसागर अंबिलवादे, वकील उच्च न्यायालय औरंगाबाद यांचा शेतकर्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला,

----------------

### विशाल जाजू यांची

सामाजिक , सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या हिरीरीने सहभाग दिसून येतो. अंबाजोगाई शहर तथा पंचक्रोशीत स्व विजयकुमार जाजू यांचा दांडगा जनसंपर्क होता. अंबाजोगाई शहरातील अनेक कुटुंब स्व विजयकुमार जाजू यांनी वसवली व स्थिरावली आहेत. विजयकुमार जाजू यांची व त्यांच्या कार्याची उजळण आजही अंबाजोगाई शहरात केल्या जात आहे. जाजू घराण्याची पुण्याई आजही त्यांच्या परिवारास मोठा आदर्श घालून देत आहेत. तीच परंपरा त्यांचे सुपुत्र विशाल जाजू हे पुढे चालवत आहेत. अंबाजोगाई शहरात राष्ट्रवादी काँग्रेस व राजकिशोर मोदी यांना मानणारा मोठा वर्ग आहे. राजकिशोर मोदी यांचा अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून झालेला जनसंपर्क व विशाल जाजू यांचा कौटुंबिक वारसा हा अंबाजोगाई नगर परिषदेच्या निवडणुकीत मोठा करिष्मा दाखवू शकतो. महाराष्ट्र शासन व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय व लोकाभिमुख योजना सामान्य मतदारांपर्यंत पोचविण्यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी अपेक्षाही विशाल जाजू यांच्या कडून पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. विशाल जाजू यांची बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. विशाल जाजू यांना जिल्हा उपाध्यक्ष पदाचे नियुक्ती पत्र देताना राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, प्रा महेंद्र आचार्य , सुभाष पाणकोळी, अनुप जाजू, अक्षय जाजू , बारगजे, बाबजे व विशाल जाजू , सुरेश साळवे यांचा मोठा मित्र परिवार उपस्थित होता.

----------------

### अंबाजोगाई शहरातील बहुसंख्य

खांद्याला खांदा लावून त्याची साथ देण्यासाठी अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्रमांक १, प्रभाग क्रम २ , प्रभाग क्रमांक ३ , ४, ९,१०, ११ ,१२, १४,१५ या प्रभागातील पटाईत गल्ली, बागवान गल्ली , झारे गल्ली, चौभारा परिसर, मंगळवार पेठ, बलुत्याचा मळा, गौड गल्ली, धनगर गल्ली, साबून गल्ली, मणियार गल्ली, सदर बाजार,भोई गल्ली, गवळी पुरा, गांधी नगर, बिलाल नगर, क्रांती नगर या व अशा अनेक भागातील असंख्य नवतरुण बिनशर्त संकेत मोदी तसेच राजकिशोर मोदी यांच्याकडे वळल्या जात आहे. या नवतारुणांचा जोश व उत्साह पाहून मोदी कुटुंब हत्तीचे बळ लाभल्याची अनुनभूती घेत आहे. त्यांच्यात शहराच्या विकासाची जनभावना पुन्हा जोमाने उफाळून येऊ लागली आहे. राजकिशोर मोदी यांनी मागील तीस पस्तीस वर्षांपासून अंबाजोगाई शहरासाठी केलेल्या सामाजिक , राजकीय , आर्थिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यावर प्रेरित होऊन आजचा तरुण वर्ग त्यांच्या संपूर्ण पणे पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा संकल्प करत आहेत. त्यांनी शहरात विविध शैक्षणिक संस्थाच्या माध्यमातून अंबाजोगाई शहर व परिसरातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षित केले आहेत. त्याचबरोबर बँक , पतसंस्था, मल्टिस्टेट यांच्या माध्यमातून देखील शेकडो तरुण बेरोजगारांना आर्थिक साहाय्य करून त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना उभा केले आहे. बाल- झुंबडच्या माध्यमातून शहर व परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना एक हक्काचे सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळेच राजकिशोर मोदी हे नाव अंबाजोगाई शहरातील लहानापासून ते वयोवृद्ध नागरिकांच्या मना मनामध्ये घर करून आहे. याचा थेट फायदा हा संकेत मोदी व राजकिशोर मोदी यांना व त्यांच्या संपूर्ण सहकार्यांना या नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत हमखास पणे होईल अशी खात्री मोदी परिवारास दिसून येत आहे.

----------------

### अशोक रसाळ यांचे भविष्य

व्यक्त केले व प्रीतम ताई साहेबांचे यांचे उद्धाटनास आल्याबद्दल आभार मानले . कार्यालयाच्या उद्धाटन प्रसंगी राज्य सदस्य सर्जेराव तात्या तांदळे व माजी जिल्हा परिषद सदस्य भरत काळे यांनी भाषण केली या कार्यक्रमाला माझी जिल्हा सदस्य संतोष दादा हंगे,प्रा. देविदास नागरगोजे, चंद्रकांत फड, मुरलीधर ढाकणे,अँड उध्दव रासकर, मनोज पाटील, अशोक लोढा, संगीताताई धसे, विष्णू चाटे, संदीप उबाळे, अमोल वडतिले,मांजरसुंभा ग्रामपंचायतचे सरपंच अरुण रसाळ यांच्यासह जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी व मांजरसुभा पंचक्रोशीतील भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

----------------

# पान १ वरून...

### आता गूळ कारखाने देखील

ऊस खरेदीच्या दरावरही नियंत्रण ठेवले जाते. मात्र, सध्या गूळ कारखान्यांवर कोणतेही बंधन नाही. ते कोठून ऊस आणतात, शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे पैसे देतात की नाही, साखर कारखान्यांप्रमाणे प्रदूषण नियंत्रण व इतर औद्योगिक नियमावलीचे ते पालन करतात की नाही, याची कोणतीच माहिती शासनाकडे उपलब्ध नाही. तसेच, गुऱ्हाळे कधीही सुरू होतात, कधीही उसाची खरेदी करतात. यासंदर्भात साखर कारखानदारांकडून तक्रारी आल्यानंतर साखर कारखान्यांप्रमाणे मोठ्या गूळ कारखान्यांनाही कायद्याच्या चौकटीत आणण्याची तयारी सुरू केली आहे.

-------------

### विद्यार्थी सहलींसाठी एसटी

सहलींसाठी एकूण भाड्यात ५० टक्के सवलत देऊन याला पाठिंबा देते. नोव्हेंबर २०२४ ते या वर्षी फेब्रुवारी या कालावधीत महामंडळाने शैक्षणिक सहलींसाठी १९,६२४ बसेस पुरवल्या होत्या, ज्यातून परतफेडीसह ९२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. २०२५-२६ साठी आगार व्यवस्थापक आणि स्थानक प्रमुखांना शैक्षणिक संस्थांशी समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत. आगार प्रमुख आणि स्थानक अधिकारी राज्यातील प्रमुख ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या सहलींचे नियोजन करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांना भेटतील, असे त्यांनी सांगितले.

--------------

### बीड जिल्ह्यात तब्बल २ लाख १३ हजार

आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने तातडीने गावपातळीवर मोहीम राबवावी, जनजागृती करावी आणि वंचित शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण करावी, अशी मागणी माहीती अधिकार कार्यकर्ते निलेश चाळक यांनी केली आहे.

----------

### बीडच्या माजी मंत्र्याचा

पंकजाताई मुंडे यांनी क्षीरसागर दाम्पत्याचे भाजपात स्वागत केले. कार्यक्रमाला भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नगरसेवक शुभम धूत यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. भाजपमध्ये प्रवेशानंतर प्रतिक्रिया देताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर पंकजाताई मुंडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आम्ही भाजपमध्ये प्रवेश केला. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने तयारी सुरू होती. आता आम्ही भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढणार आहोत. बीड नगरपरिषदेसाठी जागा महिलांसाठी राखीव आहे, त्यानुसार आम्ही निवडणूक लढवू. भाजप आणि आमचे कार्यकर्ते एकत्रितपणे काम करतील. राष्ट्रवादी सोडण्यामागे काही कारणे होती, आता मोकळा श्वास घेत असल्याचेही त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले, बाहेरचे लोक बीडमध्ये येऊन वेगवेगळ्या निवडणुकीत प्रयोग करत आले, परंतु बीडकरांनी ते सातत्याने हाणून पाडले. हा प्रयोगही बीडकर हाणून पाडतील आणि स्वाभिमान जपतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

----------------

### ज्यांच्या सभेला खुर्च्या रिकाम्या

प्रतिक्रिया दिली आहे. बिहारमध्ये अद्याप एनडीएचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा समोर आलेला नाही, असा प्रश्न पत्रकारांनी उद्धव ठाकरे यांना विचारला. यावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, हेच त्यांच्या (एनडीए) बहुमताचे एक गणित आहे. कारण आपल्याकडे महाराष्ट्रातही त्यांना (एनडीए) मोठे बहुमत मिळाले. पण तरीही मुख्यमंत्री पदाचा चेहरा निवडायला त्यांना काही कालावधी लागला. अशाच प्रकारचे बिहारमध्येही सुरू आहे. मग एवढे मोठे बहुमत मिळूनही अजूनही मुख्यमंत्री पदाचा चेहरा निवडायला वेळ का लागतो? सर्व स्पष्ट व्हायला पाहिजे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. बिहारमध्ये महिलांना १० हजार रुपये देण्याच्या योजनेवर उद्धव ठाकरे म्हणाले की, हा एक फॅक्टर झाला. याचा कदाचित काहीसा फरक पडलाही असेल. पण तेथील लोक ज्या समस्या भोगत आहेत, ते एवढ्या लवकर बदलतील असे वाटत नाही. तसेच ते पुढे म्हणाले की, भाजप प्रादेशिक पक्ष संपवायला निघाले आहेत. भाजपला राष्ट्रगीत शिकवले पाहिजे. त्यामध्ये पंजाब, सिंध, महाराष्ट्र आहे. या प्रादेशिक अस्मिता मारायला भाजप निघाला आहे. अनेकतेत एकता आहे. ती एकता मारण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे म्हणत त्यांनी भाजपवर निशाणा साधला. गेल्या काही काळापासून मुंबईत महाविकास आघाडीमध्ये मनसेच्या समावेशावरून धुसपूस सुरु आहे. मनसेच्या समावेशाला काँग्रेसचा विरोध असल्याचे अनेकदा स्पष्ट झाले आहे. अशामध्ये आगामी मुंबई महापालिका निवडणुकीमध्ये शिवसेना उबाठा पक्ष हा स्वबळावर लढणार का? असा प्रश्न उद्धव ठाकरे म्हणाले की, आमचा निर्णय घेण्यासाठी आम्ही समर्थ आहोत, तर त्यांचा निर्णय ते घेण्यास समर्थ आहेत,असे त्यांनी स्पष्ट केले.

--------------

### एक पुतण्या राष्ट्रवादीत दुसरा

मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नव्हता त्यांच्या निर्णयाची सर्वजण वाट पाहत असताना अचानक पुतण्याने भाजपात केलेल्या प्रवेशामुळे काय निर्णय घ्यावा या द्विदा मनस्थिती मध्ये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर अडकले आहेत. मागील नगरपालिका निवडणुकीमध्ये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना त्यांच्याच कुटुंबातून पुतण्या संदीप क्षीरसागर यांनी बंडखोरी करत आव्हान दिले होते. त्यांनी एक-दोन नव्हे तर वीसच्या जवळपास सदस्य निवडून आणले होते. गेली अनेक वर्ष क्षीरसागरांची नगरपालिकेवर सत्ता होती त्यावेळी देखील एक पुतण्या योगेश क्षीरसागर सोबतीला होते मात्र आता हे सारे गणितच बिघडले आहे. आमदार संदीप क्षीरसागर हे राष्ट्रवादी शरद पवार गटात तर दुसरा पुतण्या डॉक्टर योगेश क्षीरसागर हे राष्ट्रवादी अजित पवार गटांमध्ये होते त्यांनी चुलत भावा विरुद्ध विधानसभेची निवडणूक देखील लढवली, मात्र आता नगरपालिका निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीने नियोजन केले जाईल आणि त्याला काका जयदत्त क्षीरसागर यांची मदत मिळेल अशी अपेक्षा लावली जात होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटांमध्ये आमदार विजयसिंह पंडित व माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी बीड नगरपालिकेत मोठा हस्तक्षेप सुरू केला आणि याच नाराजी मधून योगेश क्षीरसागर यांनी विधानसभा अध्यक्ष पदाचा राजीनामा देत थेट मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. हे सर्व राजकीय गणिते पाहता घरातील ज्येष्ठ व माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची मात्र मोठी गोची निर्माण झाली आहे. त्यांना थेट भाजपाचेही काम करता येत नाही आणि दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादीचे देखील. अशा परिस्थितीमध्ये जयदत्त अण्णा क्षीरसागर काय निर्णय घेतात आणि काय नाही याकडे बीड शहरातील व जिल्ह्यातील जनतेचे लक्ष लागले आहे. पूर्वी दोन्ही पुतणे दोन राष्ट्रवादीमध्ये होते आता एकाने भाजप प्रवेश केला. मागील निवडणुकीमध्ये जयदत्त क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार योगेश क्षीरसागर यांना मदत केली होती आता तेच भाजपात गेल्याने त्यांना मदत करावी की अन्य कोणाला या द्विधा मनस्थितीमध्ये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर अडकले आहेत.

----------------

### एआय तंत्रज्ञानामुळे देशात

अर्थतज्ज्ञ सौरभ मुखर्जी यांनी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीतून यासंबंधी इशारा दिला. भारताने अमेरिकेच्या बदलत्या व्यापार धोरणांशी योग्य पद्धतीने जुळवून घेतले नाही तर आयटी, बँकिंग, मीडिया, ई-कॉमर्स यांसारख्या क्षेत्रांत व्यापक प्रमाणात व्हाईट-कॉलर जॉब कट्स दिसू शकतात. तज्ज्ञांच्या मते, एआय आणि जनरेटिव्ह टेक्नॉलॉजीजच्या वापरामुळे कंपन्यांना कमी कर्मचा-यांमध्ये अधिक काम करता येते. विशेषत: एआय आणि बिझनेस प्रोसेस मॅनेजमेंट क्षेत्रात हजारो नोक-या कंत्राटी किंवा प्रोजेक्ट-आधारित भूमिकांमध्ये बदलत आहेत. भारतातील अनेक मोठ्या कंपन्यांनी मागील एक वर्षात नवीन भरतींना ब्रेक, कर्मचा-यांचे पुनर्संरचना कार्यक्रम आणि काही विभागांचे ऑटोमेशन आक्रमक पद्धतीने सुरू केले आहेत. त्यामुळे पारंपरिक, स्थिर वेतनभोगी नोक-यांचा पाया कमकुवत होत आहे. मध्यमवर्गीय कुटुंबांवर गृहकर्ज, वाहनकर्ज आणि वैयक्तिक कर्जांचे प्रमाण गेल्या ५ वर्षांत प्रचंड वाढले आहे. नोकरी गमावण्याची भीती वाढल्याने या कर्जांचा भार मध्यमवर्गीयांवर अधिकच ताण निर्माण करत आहे. तज्ज्ञांच्या मते भारतात नोकरीची अनिश्चितता+वाढते कर्ज+महागाई यामुळे मिडल क्लास आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक अस्थिर स्थितीत आला आहे. अमेरिकेने काही आयातीत वस्तूंवर धोरणात्मक टॅरिफ वाढवण्याचे संकेत दिले आहेत. त्याचा थेट परिणाम भारतातील उत्पादन, एआय-सेवा निर्यात आणि मॅन्युफॅक्चरिंग सेक्टरवर होऊ शकतो. अमेरिकन व्यापार धोरण स्थिर नसेल, तर भारतातील लाखो नोक-या धोक्यात येऊ शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण व्हाव्यात, यासाठी सरकार, उद्योग क्षेत्र आणि कौशल्य-विकास व्यवस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांची नितांत गरज आहे. अन्यथा २ कोटी नोक-या धोक्यात येण्याचा इशारा वास्तवात बदलू शकतो आणि त्याचा सर्वाधिक फटका मध्यमवर्गालाच बसेल. त्यामुळे भारत सरकारनेदेखील या दृष्टीने पावले उचलणे गरजचे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे हाच सुरक्षित मार्ग**

तज्ज्ञांनी रोजगार क्षेत्रातील हा बदल जलद गतीने चालू राहील. एआयमुळे पुढील २-३ वर्षांत भारतात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत. त्याचा थेट फटका मध्यमवर्गीयांना बसणार आहे. दरम्यान, कौशल्यवृद्धी, एआय आधारित नवीन क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे हेच पुढील काळातील सुरक्षिततेचे मार्ग आहेत.

-------------

### बिहार निवडणुकीत महिलांना पैसे

दुसऱ्या प्रकल्पासाठी आलेल्या २१ हजार कोटी रुपयांमधून घेतले गेले होते. निवडणुकांसाठी आचारसंहिता लागू होण्याच्या एक तास आधी १४ हजार कोटी रुपये काढून राज्यातील १.२५ कोटी महिलांना वाटण्यात आले, असा आरोप त्यांनी केला. मी म्हटल्याप्रमाणे, ही आमची माहिती आहे. जर ते चुकीचे असेल तर मी माफी मागतो; पण जर ते खरे असेल तर प्रश्न उद्भवतो की हे किती नैतिक आहे, असा सवालही त्यांनी केला. बिहारमध्ये पुन्हा रालोआचे सरकार आले नाही तर महिलांना उर्वरित रक्कम हस्तांतरित केली जाणार नाही, अशी अफवा पसवली गेली. एकूण चार कोटी महिलांपैकी २.५ कोटी महिलांना अद्याप रक्कम मिळालेली नाही आणि त्यांना असे वाटते की एनडीए सत्तेत आले नाही तर त्याचा फायदा त्यांच्यापर्यंत पोहोचणार नाही, असेही पवन वर्मा म्हणाले. राज्याच्या कानाकोपऱ्यात दारू जास्त किमतीत विकली जात आहे.ज्यांना त्यांचे घर चालवावे लागते त्यांच्यावर याचा परिणाम होणार नाही का?'', असा सवाल करत प्रशांत किशोर यांनी दारुबंदी उठविण्याची दिलेले आश्वासन योग्यच होते. त्यामुळे आमचा पराभव झाला नाही तर सत्ताधार्यांनी निवडणूक जाहीर होण्यापूर्वी केलेल्या दहा हजार रुपयांच्या हस्तांतरणामुळे आणि महिलांबद्दल धोरणांमुळे पराभवाला सामोरे जावे लागले, असेही वर्मा यांनी सांगितले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५


# बीडच्या माध्यमिक शिक्षण विभागात खाबुगिरी वाढली

## अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करा-माजी गटशिक्षणाधिकारी टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**बीडच्या जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागात मराठा समाजातील मुलांना कुणबी मराठा प्रमाणपत्राच्या आधारे शाळेत प्रवेश निर्गमवर नोंद करण्याच्या प्रत्रासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मोठा त्रास होत असून पाचशे ते एक हजार पर्यंत रक्कम घेतली जात असून या खाऊगिरीची माहिती माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे यांना होताच त्यांनी चांगलाच संताप व्यक्त केला. हा घडत असलेलाप्रकार अत्यंत गंभीर असून जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याची दखल घेऊन माध्यमिक विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे यांनी केली आहे.**



मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे म्हणून गेली दोन वर्ष वर्षापासून मनोज जरांगे पाटील जीवाची बाजी लावून लढले त्यामुळे पूर्वी कुणबी मराठा नोंदी होत्या त्या सापडविण्याचे महान काम पाटलांनी केले .ओबीसीत समावेश नसल्यामुळे समाजावर शैक्षणिक व नोकरीत मोठ्या प्रमाणावर अन्याय झाला

मुलं हुशार असून सुद्धा ते कुठेच लागले नाही त्यामुळे समाजाची गरिबीची दरी वाढत गेली दोन वर्षापासून मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी उपोषणावर उपोषण करत आपल्या जीवाची बाजी लावत राज्यभरातील मराठा समाजातील मुलांचे भविष्य घडवले आहे सरकारने ज्यांच्या नोंदी कुणबी मराठा आहेत त्यांना तपासणी अंती तहसीलदारांच्या मार्फत कुणबी मराठा प्रमाणपत्र दिले हे प्रमाणपत्र शाळेमधील प्रवेश निर्गमवर नोंद घेण्यासाठी मुलांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे जावे लागते तेथे कुणबी मराठा प्रमाणपत्र दिल्यानंतर या पत्राच्या आधारे पत्र देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यम माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात वेळ काढू पणाचे धोरण अवलंबित जात असून केवळ आणि केवळ पैशासाठी हे पत्र लवकर दिले जात नाही जर मुलांनी पाचशे ते हजार रुपये दिले तर ते संबंधित अधिकारी व कर्मचारी देतात या खाऊगिरीची माहिती माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे यांना कळताच शिक्षण विभाग कडे गेले होते प्राथमिक शिक्षणा विभागाचे कर्मचारी पैसे घेत नसल्याचे दिसून आले परंतु माध्यमिक शिक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी पैसे घेत असल्याची माहिती त्यांना मिळाली .जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याची तात्काळ दखल घेऊन भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे टेकाळे केली आहे.

## थोडक्यात



**आयएमए बीड राज्यस्तरीय पुरस्कार प्रसंगी डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ.अनिल आव्हाड ,डॉ सौरभ संजनवाला, डॉ.अमोल गीते, डॉ.अनिल बारकुल, डॉ.मुळे, डॉ.खरवडकर, डॉ.पैठणकर, डॉ.तिडके, डॉ.हुबेकर, डॉ.सानप, डॉ.ढगे, डॉ.बांगर, डॉ.शिंदे, डॉ.गायकवाड आदी.**

## पवारवाडी येथे ओंकारेश्वराचा महारूद्र अभिषेक सोहळा



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील देवकृपा नगर पवारवाडी येथील गोशाळेत त्रिधारा येथील श्री ओंकारेश्र्वर देवाचा महारूद्र अभिषेक सोहळा व देवाच्या नवमीच्या कार्यक्रम दि.१३ नोव्हेंबर गुरुवार रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. देवाच्या महारूद्र अभिषेक सोहळ्याला सकाळी ११:०० वाजता चैतन्यदायी वातावरणात प्रारंभ झाला.श्रींचा महारूद्र अभिषेक सोहळ्यात ५१ यजमानांनी सहभाग नोंदवून आपला संकल्प पुर्ण केला. त्रिधारा व माजलगाव येथील पुरोहितांच्या वेद मंत्रघोषात हा अभिषेक सोहळा संपन्न झाला. परिसरातील शेकडो महिला व पुरुष भाविक भक्तांनी देवाच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.महारूद्र अभिषेक सोहळा चैतन्यदायी करण्यासाठी आयोजक कडाजीराव कोंडीबा जाधव,माजी शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव, विठ्ठल जाधव, मुंजाबा जाधव, बाबुराव जाधव, ओंकार जाधव, जय जाधव, जगदीश जाधव, शिवाजी चव्हाण, राहुल सुरवसे, कल्याण मोहिते, विष्णू कड, यांच्यासह पवारवाडी येथील समस्त ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



**माजलगाव :- तालुक्यातील जि. प.प्रा.शाळा मोगरा येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय संस्था यांच्या माध्यमातून शाळेतील सर्व मुलांना दफ्तर, अर्धा डझन वह्या, कंपास पेटी असे साहित्य वाटप करण्यात आले.शाळेचे मुख्याध्यापक सुभाष घनघाव सर,हानुमंत पांढरपोटे सर,बालाप्रसाद चव्हाण सर,श्रीम.गायके मॅडम, सोनवळे सर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.**

## लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास "ग्रीन वर्ल्ड को.प्राईड-२०२५" पुरस्कार जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५ चा प्रतिष्ठेचा व मानाचा पुरस्कार जाहीर झाला.याबद्दल कारखाना चेअरमन, व्हा.चेअरमन, कार्यकारी संचालकांसह कारखाना प्रशासनावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



वर्ल्ड व कॉसमॉस को. ऑपरेटिव्ह बँक लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या संस्था,व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.त्याप्रमाणे या वर्षीचा जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल दिला जाणारा "ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ " हा पुरस्कार तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर कारखान्यास नुकताच घोषीत झाला.तसे पत्र ग्रीन वर्ल्ड पब्लीकेशनच्या वतीने सोळंके कारखान्यास कळविले असल्याची माहिती चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके यांनी दिली. ते म्हणाले की, लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण करताना ऊसाला दिलेला यथोचित व स्पर्धात्मक दर, साखर उत्पादनातील गुणवत्ता, उत्पादन खर्चातील सुव्यवस्था आणि कारखाना व्यवस्थापनातील पारदर्शकता यांचा उत्तम संगम साधला आहे. त्याचबरोबर कारखान्याच्या व्यापक विकासासाठी इथेनॉल उत्पादन, को. जनरेशन प्रकल्प (बिज उत्पादन), प्रेसमड व बायो फर्टीलायझर उत्पादन, डिस्टिलरी, कचरा व्यवस्थापन, बायोगॅस प्रकल्प यातील काही जोड व्यवसायांचे यशस्वीपणे संचालन करुन शाश्वत विकासाचे मॉडेल निर्माण केले आहे. या सर्व उपक्रमांव्दारे शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ, स्थानिक अर्थव्यवस्थेची मजबुती आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मातीस मोठा हातभार लागलेला आहे. सहकार मुल्यांवर आधारीत या प्रगत, पारदर्शक आणि समाजाभिमुख कारखाना व्यवस्थापनाच्या गुणांचा अभ्यास करुन वरील संस्थांनी कारखान्याची "ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ " या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.सदरील पुरस्काराचे वितरण दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी सहकार सभागृह कॉसमॉस को.ऑप. बँक लि, शिवाजीनगर पुणे येथे सन्माननीय केंद्रीय मंत्री व राज्यातील विविध खात्याचे मंत्री यांचे प्रमुख उपस्थितीत होणार आहे.सदरचा प्रतिष्ठेचा पुरस्कार कारखान्यास मिळालया बद्दल सर्व सभासद, संचालक, अधिकारी, कर्मचारी, हितचिंतक यांचे वतीने कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ. प्रकाश सोळंके, धैर्यशील सोळंके, चेअरमन विरेंद्र सोळंके,व्हा. चेअरमन जयसिंग सोळंके, कार्यकारी संचालक आर.सी. बडगुजर यांचे अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

## जवाहर प्राथमिक विद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू जयंती निमित्त बाल आनंद मेळावा उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

केसापुरी वसाहत येथील जवाहर प्राथमिक विद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू जयंती निमित्त बाल आनंद मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी नवविकास मंडळाचे सहकार्यवाह तथा जवाहर प्राथमिक विद्यालय शालेय समितीचे अध्यक्ष आर डी देशमुख हे होते या मेळाव्याचे उद्घाटक म्हणून संस्थेचे संचालक शिरिष देशमुख लाभले प्रमुख उपस्थिती मध्ये जवाहर माध्यमिक विद्यालयचे मुख्याध्यापक अभिमन्यू ईबिते प्राथमिक च्या मुख्य धयापिका श्रीमती अंजली शिंदे उपस्थित होते

अतिशय उत्साहाने या मेळाव्यात विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला यामध्ये विविध खाद्यपदार्थाचे स्टाल लावण्यात आले होते यातुन मुलांना व्यवहार सहकार्य उद्योजकाचे संस्कार या विषयावर भर देण्यात आला या मेळाव्याच्या निमित्ताने परिसरातील पालक माता भगिनी यांची देखील उपस्थिती होती त्यांनी देखील या मेळाव्याचा आनंद घेतला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंजली शिंदे यांनी केले उद्घाटनपर भाषणात कार्यक्रमाचे अध्यक्ष शिरिष देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि शुभेच्छा दिल्या पं जवाहरलाल नेहरू कसे गर्भश्रीमंती सोडुन स्वतंत्र



लढ्यात सहभागी झाले होते हे सांगितले त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. ईबिते सर यांनी विद्यार्थ्यांना बाल आनंद दिनाच्या शुभेच्छा देऊन मुलांचे कौतुक केले अध्यक्षीय समारोप शिरिष देशमुख यांनी विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन केले चांगले वाचन करा वाचनातून स्वतंत्र लढा काय आहे हे समजून घ्या असे सांगितले सुत्र संचालन श्रीमती शारदा यादव यांनी केले कार्यक्रमास पालकांची उपस्थिती चांगल्याप्रकारे होती हा मेळावा यशस्वी होण्यासाठी साठी सर्व शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## विद्यार्थी- पालक- शिक्षक या त्रिसूत्रीवर शैक्षणिक संकुलाचे नाव उज्वल आहे - वसंतराव देशमुख गुरुजी

माजलगाव । प्रतिनिधी

सन १९६६ ते १९७२ या दरम्यान दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा (स्नेह बंध ते मैत्री बंध) माजी विद्यार्थी मेळावा आज मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी उदघाटन सत्राचे अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंत वैद्य,व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे,शाळेचे पहिले मुख्याध्यापक वसंतराव देशमुख गुरुजी,माजी मुख्याध्यापक लक्ष्मणराव आघाव गुरुजी,तत्कालीन शिक्षक र.ब. देशमुख गुरुजी,वि. ब.देशमुख गुरुजी, विठ्ठलराव जाधव गुरुजी,गंगाधर दलाल,प्रभुअप्पा क्षिरसागर,श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास इत्यादी उपस्थित होते.या मेळाव्याची सुरुवात सांघिक पद्य, दिपप्रज्वलन व माता सरस्वती, भारत माता,पंच परिवर्तन प्रतिमेचे पूजन करून झाले. यानंतर १९६६ ते १९७२ दरम्यान तत्कालीन दिवंगत शिक्षक - विद्यार्थी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक लक्ष्मणराव आघाव गुरुजी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना पहिले मुख्याध्यापक वसंतराव देशमुख गुरुजी यांनी सांगितले की, पालक - विद्यार्थी व शिक्षक यांच्या योगदानानेच श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाने आपले नाव उज्वल केले आहे.आज आपले सर्वांचे वय ७० पेक्षा अधिक आहे या परिस्थितीत आपले शारीरिक आरोग्य, कौटुंबिक सौख्य कसे अबाधित ठेवावे याविषयी





मौलिक मार्गदर्शन केले.या मेळाव्याची भुमिका माजी विद्यार्थी,भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड यांनी या मेळाव्याची कल्पना,आयोजन व तयारी याविषयी माहिती दिली. यावेळी अध्यक्षीय समारोप संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंत वैद्य यांनी केले. प्रास्ताविक करताना केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी सांगितले की,माजी विद्यार्थी हा शाळेचा,संस्थेचा महत्त्वाचा घटक आहे.आभार ब्रीजमोहन सोनी यांनी मानले तर सुत्रसंचलन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड यांनी व स्थानिक च्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

## पिंपळादेवी नदीपात्रात वाळू तस्करांचा नंगानाच गावकऱ्यांनी दिले जिल्हाधिकारी यांना निवेदन

घाटसावळी । प्रतिनिधी

मौजे पिंपळादेवी ता. जि. बीड येथील मनकर्णीका नदीपात्रातील वाळु उपसा रात्र-दिवंस बेकायदेशीर चालु असून सुद्धा महसूल व पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे याबद्दल गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस प्रशासन यांना निवेदन देऊन देखील दखल घेतली जात नसून यांचाच यांना पाठींबा आहे की काय ?असा प्रश्न उपस्थित केला जात आहे, तहसीलदार शेळके यांना देखील निवेदन देऊन कारवाई होत नाही नेमके दुर्लक्ष का?असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**तहसीलदार शेळके अन् पिंपळनेर पोलिसांचे दुर्लक्ष?**

तहसील कार्यालयास निवेदन देऊन आणि अधिकाऱ्यास सांगुनही कुठलीही कार्यवाही होत नाही. तसेच मंडळ अधिकारी यांनाही वेळोवेळी सांगुनही त्यांच्यावर कार्यवाही होत नाही. उलटपक्षी नदी पात्रतामध्ये जे.सी.बी. ट्रॅक्टर रात्रदिवस चालु आहेत. वाळु उपसा करणारे गावाच्या रस्त्याने सुसाट वेगाने वाहने चालवतात. रात्रभर ग्रामस्थ जागरण करून कुटूंबाची काळजी घेतात. वाहकास विचारपूसस केली असता त्यांनी आमचे हप्ते चालू आहेत. तुम्ही आम्हाला आडवणारे कोण ? असे म्हणून वाहतुक चालुच ठेवलेली आहे. त्याबाबत वेळोवेळी वरील विषयी मौजे पिंपळादेवी ग्रामस्थांचे वतीने विनंती आहे की, मौजे पिंपळोदवी ता. जि.बीड येथील मनकर्णिका नदीपात्रात रात्र-दिवंस वाळू उपसास चालु आहे. त्यांच्यापासून ग्रासस्थांच्या जिवला धोका आहे. सदरील वाळु उपसा करणारे मनकर्णिका पत्रातील वाळु उपसा करून बेकायदेशीर वाहतुक करत आहेत. सदरील वाळू उपसा करणे बंद न केल्यास समस्त गांवकरी अमरण उपोषण करतील त्याच्या निर्वाहाची जबाबदारी सर्वस्वी शाससनाची राहील.सदरील अर्जाचा विचार करून लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येवून वाळु उपसा बंद करण्यात येणे न्यायाचे होईल. असे निवेदनात म्हटले आहे .

## आज बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र रामतीर्थ (ता. बीड) येथे प.पू. महायोगी दादा महाराज खडकीकर यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक उत्सवाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षीप्रमाणे श्रद्धा, भक्ती आणि हरीनामाच्या गजरात सुरू होणार्या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात यंदा दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी झाली. सप्ताहाचे औचित्य साधत विविध आध्यात्मिक कार्यक्रम, प्रवचने, कीर्तन आणि भजन मंडळांच्या सेवा सुरू असून परिसरात दिंडी, नामा-घोष आणि धार्मिक शिस्तीने वातावरण भारावून गेले आहे.



या आध्यात्मिक सप्ताहातील प्रमुख आकर्षण म्हणून दि. १७ नोव्हेंबर, रात्री ९.०० ते ११.०० या वेळेत प्रसिद्ध बालकीर्तनकार ह.भ.प.सोहम महाराज सातपुते यांचे प्रभावी हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे. अल्पवयातही संत परंपरेचा गाढा अभ्यास, ओजस्वी आवाज, समजूतदार विचार आणि मनाला स्पर्श करणारी निरूपणे यामुळे सोहम महाराजांची किर्तनसेवा संपूर्ण जिल्ह्यात लोकप्रिय झाली आहे. कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात असून रामतीर्थ परिसरात भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. पांडुरंगाच्या नामस्मरणात हरएक भक्ताने सहभागी व्हावे, कीर्तनातून अध्यात्मिक ऊर्जा व संस्कारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक विद्यागुरु खडकीकर यांनी केले आहे. सप्ताहादरम्यान रामतीर्थ परिसरात स्वच्छता, पाणी, प्रसाद, बसण्याची व्यवस्था आणि सर्व सुविधा उत्तम प्रकारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. स्थानिक सेवेकर्यांचा उत्साह व भक्तांच्या सहभागामुळे वर्षानुवर्षे हा कार्यक्रम अधिक भव्यतेने साजरा होत आहे. आजच्या सोहम महाराज सातपुते यांच्या कीर्तनासाठी सर्व भक्तांनी उपस्थित राहून हरीनामाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## भाजपाची महिला ब्रिगेड मैदानात - गिताभाभी पवारांचा भेटीगाठीवर भर, मतदारांचा मोठा प्रतिसाद

गेवराई । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या वतीने, गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार गिताभाभी बाळराजे पवार यांनी मतदारांच्या भेटीगाठीवर भर दिला असून, भाजपाची महिला ब्रिगेड मैदानात उतरल्याचे चित्र दिसून येत आहे. मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, गेवराई नगर परिषद भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात देऊन एकदा संधी द्यावी असे आवाहन भाजपाच्या महिला ब्रिगेड टिमच्या वतीने केले जात आहे. दरम्यान, मला एक संधी द्या, तुमच्या आशीर्वादाने शहराच्या विकासात भर घालू, अशी साद घालत गिताभाभी पवार यांनी प्रचाराला जोरदार सुरूवात केली आहे. गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने युवा नेते बाळराजे पवार यांच्या पत्नी गीताभाभी पवार यांची अधिकृत उमेदवारी जाहीर झालेली आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी ही निवड जाहीर केली. निवड जाहीर झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाची महिला ब्रिगेड टीम भाभींच्या प्रचारासाठी सरसावली असल्याचे चित्र गेवराई



शहरातले अनेक प्रभागांमध्ये पाहायला मिळाले. प्रचाराचा पहिला टप्पा मतदारांच्या भेटीगाठीने सुरू असून जागोजागी गीताभावी पवार यांना महिलांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे गेल्या अनेक वर्षापासून गीताभाभी महिलांच्या प्रश्नावर नेहमी पुढे राहिलेल्या आहेत. महिलांच्या आरोग्याची काळजी आणि बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करून महिलांना आर्थिक दृष्ट्या बळ देण्याचे काम त्यांनी केले आहे.आरोग्याच्या संदर्भामध्ये महिलांचे अनेक प्रश्न अगदी जटील असतात. या संदर्भाने गीताभाभी पवार यांच्या महिला ब्रिगेडने गेल्या पाच सहा वर्षांपासून खास महिलांसाठी योगाचे धडे दिलेले आहेत. त्यामध्ये कधीही खंड पडलेला नाही आणि त्यामुळे या योगसाधनेचा गेवराई शहरातील महिलांना प्रचंड लाभ झालेला आहे. गीताभाभी बाळराजे पवार गेल्या पंधरा वर्षापासून गेवराई नगर परिषदेच्या नगरसेविका म्हणून काम करत आहेत. पवार घराण्याचा वारसा त्या समर्थपणे सांभाळत आहेत. पवार घराण्याची मोठी सून म्हणून गीताभावी पवार यांचे गेवराई शहरांमध्ये मोठे वलय निर्माण झालेले आहे. शहरातील प्रत्येक वार्डातील महिलांची नावे गीता भाभी पवार यांना तोंडपाठ आहेत. गेवराईच्या राजकारणामध्ये पवारांची मोठी सून म्हणून गीता भाभी यांनी मोठे नाव कमावले आहे. गेवराई नगर परिषदेच्या माध्यमातून घरकुल योजना ग्रामीण भागातील नागरिकांना वृद्धापकाळ अनुदान योजना, कुटुंब अर्थसाह्याच्या संदर्भातली महत्त्वाची कामे गीताभाभींच्या माध्यमातून आजवर झालेली आहेत. त्याचबरोबर भारतीय जनता पक्षाच्या युवा महिलांना आर्थिक दृष्ट्या पाठिंबा देऊन त्यांना सक्षम करण्यामध्ये त्यांनी नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. त्या गेल्या पंधरा वर्षापासून जनतेच्या सेवेत आहेत. विशेष म्हणजे महिलांसाठी त्यांचं काम अतिशय चांगलं आहे. त्यामुळे गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी त्या अत्यंत योग्य उमेदवार असल्याची चर्चा मतदारांमध्ये असून, भाग्यश्री भाभी पवार , रत्नमाला नानी मोटे, रेवती घुंबार्डे, स्वाती राक्षस भवन कर, निर्मला अर्दड, माधुरी कुरकुटे, संगीता गिरी, राधा पवार, मंगल ताई जाधव, लक्ष्मी आतकरे, रेखा बनगे, सायमा पठाण यांनी प्रचाराच्या पहिल्या फेरीत मतदाराच्या गाठीभेटी घेऊन बाजी मारली आहे.

## मधुमेहावरील महाशिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सलग तेरा वर्षापासून मधुमेह तज्ञ डॉ. अतुल शिंदे यांचा उपक्रम

समाजात वाढणारा मधुमेह रोखण्यासाठी विविध उपक्रम राबवत मधुमेहाची मोफत तपासणी व उपचार करण्यासाठी सदैव अग्रेसर असणारे मधुमेह तज्ञ डॉ. अतुल शिंदे यांनी सतराशे रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार केले या उपक्रमाचे त्यांचे तेरावे वर्ष आहे शुक्रवारी अंबाजोगाई येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, आय एम ए, एम्पा व योगेश्वरी डायबिटीस केअर सेंटर, प्रशांत नगर,अंबाजोगाई यांच्या वतीने मधुमेहावरील महा शिबिर व मोफत तपासण्या व मोफत औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक डॉ. अतुल शिंदे यांनी मधुमेह होऊ नये यासाठी पंचसूत्री





सांगितली त्यासोबतच मधुमेहाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी आहाराचे व व्यायामाचे महत्त्व नमूद केले तसेच भारतातील वाढलेला मधुमेह रोखण्यासाठी जनजागृती चे महत्व सांगितले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नवनाथ घुगे, डॉ. श्रीनिवास रेड्डी,डॉ. राजेश इंगोले, डॉ. राहुल धाकडे, डॉ. उद्धव शिंदे, डॉ.सुलभा पाटील, डॉ. स्वाती शिंदे, प्रा.रोहिणी पाठक, मंजुषा जोशी उपस्थित होत्या.सुरुवातीला मान्यवरांनी दीपप्रज्वल करून धन्वंतरीचे पूजन करण्यात आले. यंदाचा डायबेटिक पेशंट ऑफ दि इयर पुरस्कार सुरेश मस्के यांना देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी डॉ नवनाथ घुगे, डॉ . राजेश इंगोले , डॉ .श्रीनिवास रेड्डी, डॉ सुलभा पाटील यांची भाषणे झाली. वैद्यकीय प्रतिनिधी निलेश सूर्यवंशी, अविनाश धायगुडे, उमेश देशमुख , रणजीत मंगे,विनोद स्वामी , अजित स्वामी ,माधवी सरवदे ,सारिका जाधव यांचाही सत्कार करण्यात आला. सुरुवातीला प्रा . रोहिणी पाठक यांनी प्रास्ताविक केले . पाहुण्यांचे स्वागत डॉ . स्वाती शिंदे यांनी केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवकुमार निर्मळे यांनी केले . शेवटी मंजुषा जोशी यांनी सर्वांचे आभार मानले.

# ऊसतोड कामगारांना स्वच्छ पाणी, शौचालय सुविधा पुरविणे कारखान्यांना बंधनकारक

## उच्च न्यायालयाने दिला होता आदेश

कोल्हापूर : कोल्हापूर ऊस पट्ट्यात ऊस तोडणीचे काम वेगाने सुरु आहे. अनेक ठिकाणी ऊसतोड कामगारांची कुटुंबे जिथे जागा मिळेल तिथे झोपड्या बांधून राहिली आहे. काही ठिकाणी पिण्याचे स्वच्छ पाणी आणि शौचालय सुविधा नसल्याने त्यांची गैरसोय होते. अशा कामगारांना साखर कारखान्यांनी चांगल्या सुविधा देणे आता अनिवार्य आहे. या सुविधांबाबतची तपासणी विशेष पथकांद्वारे करण्यात यावी, अशा स्पष्ट प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. ज्या कारखान्यांनी आवश्यक सुविधा पुरवल्या नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

सुमोटो याचिकेअंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करीत जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी ऊसतोड कामगारांसाठी चांगल्या सुविधा देणे आता अनिवार्य ठरले आहे. याबाबत नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात झालेल्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. या वेळी जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रशासन



समिती, समाजकल्याण, आरोग्य, पोलीस, महिला आणि बाल विकास, शिक्षण, पुरवठा, कामगार, परिवहन, साखर आदी विभागांचे प्रतिनिधीही या बैठकीत सहभागी झाले होते. यावेळी जिल्हाधिकारी येडगे यांनी कामगारांना पुरविण्यात येत असलेल्या सुविधांबाबत उपस्थित असलेल्या सर्वांना सूचना केल्या. ते म्हणाले, समितीमार्फत तयार करण्यात आलेल्या १४ नमुन्यांमध्ये ऊसतोड कामगारांना मिळणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ, ० ते ६ वयोगटातील मुलांसाठी तसेच गरोदर मातांसाठी उपलब्ध होणाऱ्या सुविधा, रुग्णवाहिका, मुलांचे शिक्षण, पिण्याचे स्वच्छ पाणी, शौचालय सुविधा, पुरेशा प्रकाश व्यवस्था, लैंगिक शोषणाविरुद्ध कार्यरत समितीचे कामकाज, जनावरांसाठी आवश्यक लसीकरण आदी सर्व बाबींची माहिती तत्काळ सादर करावी.

जिल्ह्यातील सर्व ऊसतोड कामगारांच्या राहण्याच्या ठिकाणांचे नकाशे तयार करा, महिला अत्याचार प्रतिबंधक समिती स्थापन करून त्या सतत सक्रिय ठेवा, बालसंस्कार गृहांची स्थापना करा. एकही मूल शाळेबाह्य राहू नये, ही जबाबदारी पूर्ण करावी. याबाबत शिक्षण विभागाने सतत पाठपुरावा करावा. कारखान्यांनी या सुविधांबाबत नाविन्यपूर्ण कल्पना राबवून चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. या केलेल्या कामांबाबत समिती पथकांद्वारे तपासणी करून कामांची शहानिशा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# घन पद्धतीने आंबा लागवड केल्यास होईल मोठा फायदा



पिकांच्या आणि फळबागांच्या लागवडीचा जर आपण विचार केला तर अधिक उत्पादनाच्या दृष्टिकोनातून फळबाग असो की पिके यांचे लागवडीतील अंतर किंवा लागवड पद्धत खूप महत्त्वाचे ठरते. आपण खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन इत्यादी बाबींकडे काटेकोरपणे लक्ष देतो. अगदी त्याच पद्धतीने लागवड पद्धतीकडे देखील लक्ष पुरवणे गरजेचे आहे. जर आपण आंबा लागवडीचा विचार केला तर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा तर जास्तीच्या उत्पादनासाठी आवश्यक आहेच परंतु आंब्यासाठी लागवड पद्धत महत्त्वाची आहे.

घन लागवड पद्धत : जर आपण शिफारशीत आंबा लागवड अंतराचा विचार केला तर ते १० बाय १० मीटर आहे. परंतु घन लागवड पद्धतीत ५ बाय ५ मीटर किंवा ५ बाय ६ मीटर या अंतरावर आंबा लागवड करणे जास्त फायद्याचे दिसून येत आहे. या अंतरावर दोन झाडांमधील अंतर १० ते १२ वर्षांपर्यंत मिळून येत नसल्यामुळे तो पर्यंत आपण या बागेतून दुप्पट ते तिप्पट उत्पन्न मिळवू शकतो. समजा आपण पारंपारिक दहा बाय दहा मीटर अंतरावर आंबा लागवड केली तर प्रति हेक्टर १०० झाडे लागवड केली जातात. परंतु जर लागवड पद्धतीचा विचार केला तर यामध्ये हेक्टरी ४०० झाडांची संख्या ठेवता येऊ शकते. दुसरे महत्त्वाचा फायदा म्हणजे झाडांचा घेर आणि उंची यामध्ये मर्यादित ठेवता येते. यासाठी शेतकरी बंधू छाटणी आणि वाढ निरोधकांचा वापर करू शकतात.

घन लागवडीचे फायदे : एका ठराविक क्षेत्रामधून जास्त उत्पादन तसेच झाडे लहान असल्यामुळे फळांची विरळणी,विविध कीटकांच्या बंदोबस्तासाठी फवारणी व छाटणी इत्यादी गोष्टी करणे खूप सोपे होते. जेव्हा तुम्ही आंबा फळांची काढणी कराल त्यासाठी झेला किंवा खुडी न वापरता हाताने काढणी शक्य होते. एवढेच नाही तर फळाची गुणवत्ता व प्रत सुधारावी यासाठी वेगळ्या प्रकारचे उपाय सहजपणे करता येतात.

# शेतकरी कर्जमाफीचा शब्द पाळणार; एकनाथ शिंदेंची ग्वाही

परभणी : राज्यात शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा अनेक दिवसापासून चर्चेत आहे. त्यातच बच्चू कडू यांच्या आंदोलनानंतर सरकारने ३० जून २०२६ हि शेतकरी कर्जमाफीची अंतिम तारीख दिली आहे. त्यासाठी एका उच्चाधिकारी समितीची स्थापना करण्यात आली आहे. आता याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांना शब्द देत आम्ही कर्जमाफी करणार आहोत, दिलेला शब्द पाळणार आहोत अशी ग्वाही दिली आहे. परभणीच्या महात्मा फुले विद्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.



एकनाथ शिंदे म्हणाले, महायुतीचे सरकार हे शेतकऱ्यांच्या सदैव पाठीशी आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी आपली तिजोरी पूर्णपणे खुली केली आहे. मी मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या योजना राबवल्या. शेतकऱ्यांना विजेच्या बिलामध्ये माफी देण्यात आली. 'एनडीआरएफ'चे निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना मदत केली. मदतीची मर्यादा २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत वाढविली. या वेळी सुद्धा सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभे आहे. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले, पण या संकटातही महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. ३१ हजार कोटी रुपयांची पॅकेज याच सरकारने शेतकऱ्यांसाठी दिले. आता कर्जमाफीचा निर्णय देखील या सरकारने घेतला आहे.

लवकरच शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी आम्ही करणार आहोत. दिलेला शब्द आम्ही पाळणार आहोत. महायुतीचे सरकार हे देणारे आहे घेणारे नाही, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले. यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर सडकून टीका केली. 'फेसबुक लाइव्ह' करून सरकार चालत नाही. 'फेस टू फेस' लोकांमध्ये गेले पाहिजे असा टोला त्यांनी उद्धव ठाकरेंना लगावला. माझ्याकडे आता सत्ता नाही.

मी काहीच देऊ शकत नाही असे ते सांगत आहेत पण जेव्हा तुमच्याकडे सत्ता होती तेव्हा तरी तुम्ही शेतकऱ्यांना मदत केली का? सामान्य माणूसही दुसऱ्याच्या घरी जर गेला तर साधा बिस्किट पुडा तरी घेऊन जातो, पण तुम्ही मात्र हात हलवीत आलात आणि हात हलवीत गेलात, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.

# फळबागेसाठी खड्डा कसा भराल!

आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे? आपल्या जमिनीत फळझाडे येतील का? बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का? आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील? मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय? बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकतील? जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय? प्रक्रिया उद्योग आहेत काय? अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते.

फळबाग म्हणजे ५ ते ६ महिन्याच्या पिकांच्या मशागतीची गोष्ट नसते, तो एक दिर्घकाळ चालणारा व्यवसायाच म्हणायला हरकत नाही. एकदा त्यात पडले कि थांबुन चालत नाही. अनेक वर्ष सात्यत्याने व चिकाटीने बागेचे फलोत्पादन हाती येईपर्यंत कष्ट करावे लागतात. मेहनत घ्यावी लागते. घामही गाळावा लागतो. कधी कधी पैसा अपुरा पडतो,पाणी पुरत नाही.भावनेच्या भरात एखादी बाग करावयाची ठरविले जाते आणि मग धाडस निभाविता येत नाही.सगळा पसारा अर्ध्यावर सोडावा लागतो. त्यामुळे केलेल्या कष्टाची पैशाची, अनाठायी नासाडी होते.त्यामुळे फळबाग लागवड करण्यापूर्वी योग्य नियोजनांची नितांत आवश्यकता असते.

फळबागेसाठी जमिनीची निवड : आपली जमीन कोणत्या प्रकारची आहे, हलकी, मध्यम की भारी हे सर्वाना परिचित असतेच. जर माहिती नसेल तर माहिती करून घ्यावी. जमिनीची खोली किती आहे? जमिनीच्या खाली मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा



कसा आहे? त्याचा अभ्यास करूनच फळबाग निवडावी. फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत,मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा.मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे,त्या ठिकाणच्या मातीचे परिक्षण करून घेणे आवश्यक आहे.

फळबागेची आखणी आणि अंतर : फळझाडांची आणि जागेची निवड झाल्यावर लागवडीसाठी आखणी करणे गरजेचे आहे, तेंव्हा जमिनीची आखणी करण्यापूर्वी लागवडीची पद्धत ठरवावी. फळपिके लागवडीच्या चौरस, आयताकृती, त्रिकोणी, षटकोनी, उतार (कंटूर) अशा निरनिराळ्या पद्धती आहेत. चौरस पद्धत ही सर्वात सोपी,आखणीस अडचण नसणारी आणि उभ्या-आडव्या मशागतीस योग्य अशी पद्धत प्रामुख्याने सर्वत्र वापरली जाते,आंबा, पेरू, चिकू, संत्रा, मोसंबी इत्यादी फळझाडांची लागवड या पद्धतीने केली जाते. या पद्धतीमध्ये झाडांच्या रांगा काटकोन करून असतात. दोन झाडातील आणि दोन रोपातील अंतर सारखेच येत असल्यामुळे झाडे सर्व दिशांनी पाहिल्यास सारख्या अंतरावर दिसतात. या पद्धतीने लागवड करणे अत्यंत सुलभ असते.

फळबाग लागवडीचे अंतर : विविध फळझाडांसाठी खड्डा खोदणे आणि भरणे महत्वाचे, त्याकरिता खड्ड्याचा आकार किती असावा ? हे खड्डे केंव्हा घ्यावेत? आणि केंव्हा भरावेत आणि कसे ? जेथे फळझाडांची लागवड करावयाची आहे,तेथे योग्य त्या अंतरावर चौरस पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत.जमिनीच्या मगदुराप्रमाणे आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्ड्याचा आकार ठरवावा.खड्डे खोदण्याचे काम उशिरात उशिरा एप्रिल महिन्यात पूर्ण करावे. सर्व साधारणपणे मोठ्या आकाराचे खड्डे हलक्या जमिनीत व मोठया विस्ताराच्या झाडासाठी घ्यावेत. दीर्घायुषी झाडे असतील तर १ बाय १ बाय १ मी. आकाराचा खड्डा घ्यावा. मध्यम आकारच्या झाडांना ७५ बाय ७५ बाय ७५ से. मी. व लहान झाडांना ६० बाय ६० बाय ६० से.मी आकारचे खड्डे घ्यावेत.जमीन डोंगर उतारची असेल तर समपातळी रेषा काढून त्याप्रमाणे लागवड करावी.

फळबागेसाठी खड्डा कसा भराल? खड्डा खोदताना वरच्या व खालच्या थरातील माती वेगवेगळी टाकावी.खड्डे तीन आठवडे तापू द्यावे,जेणेकरून प्रखर सूर्यप्रकाशामुळे खड्ड्याचे निर्जंतुकीकरण होईल.

मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात खड्डे परत भरावे. खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून वाळलेला पालापाचोळा १५ से.मी. थरात भरावा. मातीमध्ये २०-२५ किलो चांगले कुजलेले शेणखत अधिक २ ते ३ किलो गांडूळखत अधिक २ ते ३ किलो लिंबोळी पेंड, २५ ग्रॅम टायकोडर्मा जीवाणू अधिक १५ ग्रॅम स्फुरद विरघळवणारे जीवाणू अधिक २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर हे मिश्रण मिसळून घ्यावे. खड्डा जमिनीच्या वर ५ ते ७ से.मी उंच भरून ठेवावा. म्हणजे पावसाळ्याच्यासुरुवाती बरोबर लागवड करता येईल.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२५ : मुघल शासक बाबर याने पाचव्यांदा भारत जिंकण्याच्या उद्देशाने भारतात प्रवेश केला.
१८३१ : ग्रॅन कोलंबिया या प्रांताचे विभाजन होऊन इक्वेडोर व व्हेनेझुएला असे दोन देश अस्तित्त्वात आले.
१८६९ : भूमध्य समुद्र व लाल समुद्र यांना जोडणार्या सुएझ कालव्याचे उद्घाटन झाले. या कालव्याचे बांधकाम मात्र १० वर्षे आधीच पूर्ण झाले होते.
१९३२ : तिसर्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली. या परिषदेवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व इंग्लंडमधील 'लेबर पार्टी'ने बहिष्कार टाकल्यामुळे या परिषदेला केवळ ४६ प्रतिनिधी उपस्थित होते.
१९३३ : अमेरिकेने सोविएत युनियनला मान्यता दिली.
१९६६ : भारताच्या रिता फरिया हिने जागतिक सुंदरी हा विश्व पुरस्कार जिंकला होता, हा पुरस्कार जिंकणारी ती आशिया खंडातील महिला होती.
१९५० : ल्हामो डोंड्रब हे अधिकृतपणे वे१४ दलाई लामा बनले.
१९७० : सेवियत अंतराळ यान ' लुनाखोद -१' चंद्राच्या भूमीवर उतरले होते.
१९९२ : महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेचे अध्यक्ष हरी नरके यांना दिल्ली येथील 'भारतीय दलित साहित्य अकादमी'ची फेलोशिप जाहीर
१९९२ : देवरुख येथील 'मातृमंदिर' संस्थेच्या संस्थापिका इंदिराबई हळबे यांची 'जीवनगौरव' पुरस्कारासाठी निवड
१९९६ : पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या सेन्द्रिय रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. के. एन. गणेश यांची अहमदाबादच्या 'नॅशनल ॲकेडमी ऑफ सायन्सेस'चे फेलो म्हणून निवड
१९९४ : रशियाच्या 'मीर' या अंतराळस्थानकाने पृथ्वीभोवती ५०,००० फेर्या पूर्ण करून नवा विक्रम केला.
१९९९ : आजच्याच दिवशी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवसाला युनेस्को ने मान्यता दिली होती.
२००५ : राष्ट्रपती पदासाठी श्रीलंका येथे निवडणुका पार पडल्या होत्या.
२००६ : अमेरिकेच्या सिनेट ने आजच्याच दिवशी भारत -अमेरिका परमाणु तहाला मंजुरी दिली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

०००९ : व्हेस्पासियन - रोमन सम्राट (मृत्यू: २३ जून ००७९)
१७४९ : कॅनिंग चे निर्माते निकोलस एपर्टीट यांचा जन्म. (मृत्यू: १ जून १८४१)
१७५५ : लुई (अठरावा) - फ्रान्सचा राजा जन्म (मृत्यू: १६ सप्टेंबर १८२४)
१९०० : सरोजिनी नायडू यांच्या पुत्री पद्मजा नायडू यांचा जन्म झाला होता.
१९०१ : युरोपियन कमिशनचे पहिले अध्यक्ष वॉल्टर हॉलस्टेन यांचा जन्म. (मृत्यू: २९ मार्च १९८२)
१९२० : भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक मिथुन गणेशन यांचा जन्म. (मृत्यू: २२ मार्च २००२)
१९२२ : अमेरिका येथील शरीर विज्ञानशास्त्रज्ञ व नोबेल पुरस्कार प्राप्त स्टेनली कोहेन यांचा जन्म झाला होता.
१९२३ : केप व्हर्दे देशाचे पहिले अध्यक्ष अरिसिदास परेरा यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर २०११)
१९२५ : रॉक हडसन - अमेरिकन अभिनेता (मृत्यू: २ आक्टोबर १९८५)
१९३२ : शकुंतला महाजन तथा 'बेबी शकुंतला' - लोभसवाणे रूप, शालीन सौंदर्य आणि कसदार अभिनयाच्या माध्यमातून चित्रपटसृष्टीत अमीट अशी मुद्रा उमटविणाऱ्या अभिनेत्री. वयाच्या ८२ व्या वर्षी ही ज्येष्ठ अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेली. आणि त्यांच्या रूपाने सिनेमाचा चं तला यांनी मराठी सिनेसृष्टीचा सुवर्णकाळ अनुभवला. (मृत्यू: १८ जानेवारी २०१५ कोल्हापूर)
१९३८ : रत्नाकर मतकरी- लेखक, नाटककार, निर्माते
१९४२ : अमेरिकन चित्रपटसृष्टीचे प्रसिध्द निर्देशक मार्टिन स्कोर्सीस यांचा जन्म झाला होता.
१९८२ : भारतीय क्रिकेटपटू युसूफ पठाण यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१२ : द टाईम्स वृत्तपत्र चे संस्थापक जॉन वॉल्टर यांचे निधन.
१९२८ : 'पंजाब केसरी' लाला लजपतराय स्वातंत्र्यसेनानी (जन्म: २८ जानेवारी १८६५)
१९३१ : हरप्रसाद शास्त्री - संस्कृत विद्वान, शिक्षणतज्ञ, इतिहासकार (जन्म: ६ डिसेंबर १८५३)
१९३५ : गोपाळ कृष्ण देवधर - भारत सेवक समाजाचे एक संस्थापक सदस्य, 'सेवासदन' या संस्थेचे शिल्पकार, सहकारी चळवळीचे आद्य समर्थक (जन्म: २१ ऑगस्ट १८७१)
१९६१ : कुसुमावती आत्माराम देशपांडे - साहित्यिक व समीक्षक, ग्वाल्हेर येथील ४३ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा (जन्म: १० नोव्हेंबर १९०४)
२००३ : भारतीय गायक सुरजित बिंद्राखिया यांचे निधन. (जन्म: १५ एप्रिल १९६२)
२०१२ : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे (जन्म: १९२६)
२०१२ : भारतीय उद्योगपती पाँटि चड्डा यांचे निधन. (जन्म: २२ ऑक्टोबर १९५७)
२०१५ : विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष अशोक सिंघल यांचे निधन.
२०१५ : कर्नल संतोष महाडिक कुपवाडा श्रीनगर येथे कोम्बिंग ऑपरेशनचे नेतृत्व करताना शहीद.
२०१६ : आसाम, जम्मू -काश्मीर व अरुणाचल प्रदेश या राज्यांचे पूर्व राज्यपाल श्रीनिवास कुमार सिन्हा यांचे निधन झाले होते.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५






# मुलीस पळवून नेलेल्या आरोपीचा व पीडीतेचा शोध एक वर्षानंतर लागला

जालना। प्रतिनिधी

घनसावंगी येथे दिनांक ०२/१०/२०२४ रोजी घनसावंगी येथुन एका अल्पवयीन मुलीस नवीन बसस्थनक च्या पाठीमागे घनसावंगी इथून मुलाने फुस लावून पळवून नेले याप्रकरणी पोलिसांना एक वर्षानंतर सापडले या बाबत तक्रारी वरुन घनसावंगी येथे भा.न्या.सं. कलम १३७(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु बराच कालावधी होवुन गेला तरी पिडीत मुलगी व आरोपी मिळुन न आल्याने गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता.

सदर गुन्हयामध्ये अ.मा.वा.प्र. कक्ष. जालना यांनी तांत्रिक विश्लेषन करुन



तसेच गुप्त बातमीदार नेमुन आरोपी व पीडीता यांची माहिती काढली असता गुन्हयातील नमुद निष्पन्न आरोपी प्रल्हाद बंडु ऊर्फ शंकर लोखंडे रा.नविन बसस्थानकाचे पाठीमागे घनसावंगी हा पिडीत अल्पवयीन मुलीसह पैठण फाटा ता. अंबड जि. जालना येथिल विटभट्टीवर काम करुन तेथे राहत असले बाबत खात्रीशिर माहिती मिळाल्याने त्यांना पैठण फाटा ता. अंबड येथुन ताब्यात घेवुन गुन्हयातील पिडीत व आरोपीस पुढील तपास कामी घनसावंगी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे. अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी गणेश शिंदे, पोउपनि रविंद्र जोशी, पोउपनि संजय गवळी, पोहेकॉ कृष्णा देठे पोहेकॉ सागर बावीस्कर (स्थागुशा), महिला अंमलदार संगिता चव्हाण, आरती सावळे, रेणुका राठोड व चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केलेली आहे.

## धांडेगाव तांडा येथील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश



जालना। प्रतिनिधी

जालना तालुक्यातील धांडेगाव येथील धांडेगाव तांडयातील अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सेवादलाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर हांडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे , रायुकाँचे तालुकाध्यक्ष उमेश मोहिते, समाधान राठोड ,राहुल राठोड, श्रीमंत खरात, शिवदास चव्हाण, पंडित राठोड, झाबु चव्हाण, पंडित पवार, विश्वनाथ राठोड, भावसिंग राठोड, हरी चव्हाण यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. या प्रवेशा वेळी अर्जुन चव्हाण, राहुल जाधव, गणेश पवार , सुनील राठोड, गणेश चव्हाण, संदीप पवार, मनोहर पवार, हरी चव्हाण, योगेश राठोड यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता व विद्यार्थी संख्यात वाढकरा -जिल्हाधिकारी



जालना। प्रतिनिधी

जालना शहर पालिका जालना जालना महापालिका शाळेत कार्यरत सर्व शिक्षकांचे कौशल्य विकास प्रशिक्षणाचे उद्घाटन मा.आशिमा मित्तल आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी बोलताना ते म्हणाले की शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गुणवंता व तसेच विद्यार्थ्यांची संख्या वाढणे गरजेचे आहे अशा त्या म्हणाल्या.

जालना शहर महापालिकेच्या वतीने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी व विद्यार्थी संख्या वाढावी या दृष्टीने सर्व शिक्षकांचे कौशल्य विकास बाबत प्रशिक्षण आयोजित केले होते सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय आशिमा मित्तल आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले सदर प्रशिक्षण सत्रास प्रशिक्षक म्हणून दीपक दराडे सर व श्रीमती राधा घुगे मॅडम यांनी सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले अशा प्रकारची सत्रे नियमित आयोजित केली जाणार आहेत असे आयुक्त मॅडम यांनी यावेळी सांगितले यावेळी कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे शिक्षणाधिकारी फैसल शहा अहेमद उपस्थित होते.



## परतूर नगरपरिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकणार-बोराडे

परतुर। प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात परतूर शहरात अनेक विकासाभिमुख कामे केली असल्यामुळे परतूर शहरातील जनता खंबीरपणे शिवसेनेच्या पाठीशी उभे राहतील आणि नगरपरिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकणार असा विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी व्यक्त केला.शनिवार (ता.१५) रोजी शिवसेनेच्या वतीने परतूर नगरपरिषद अध्यक्षपदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून सौ. रेणुका दीपक हिवाळे यांनी आपले नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्वाचन अधिकारी यांच्याकडे दाखल केले.

यावेळी जिल्हाप्रमुख श्री बोराडे बोलत होते. यावेळी मोहन अग्रवाल, सुदर्शन सोळंके, अमोल सुरुंग, दीपक हिवाळे, श्री तरवटे, शिवसेनेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मंठा तालुक्यात कष्ठरोग शोध मोहीम अभियान



मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या दरम्यान कुष्ठरोग शोध मोहीम अभियान सन २०२७ प्रर्यय शुन्य कुष्ठरोग प्रसाराचे ध्येय साध्य करण्याचे दिशेने वाटचाल करण्यासाठी या ही मोहीम आयोजित करण्यात आली असून याचा उद्देश नवीन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराने संसर्गाची साखळी खंडत करून होणारा प्रसार कमी करणे आहे त्या अनुषंगाने मंठा तालुक्यात ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

यामध्ये १७१०३८ लोकसंख्या ३४२०८ घरे याची तपासणी २६८ टिम मार्फत करण्यात येणार आहे व प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयस सदरील अभियान मध्ये सहभागी होण्यासाठी जिल्हा परिषद जालना चे मुख्यधिकारी याचे पत्र सुध्दा देण्यात येणार त्या अनुषंगाने आज मंठा येथे सर्व आरोग्य अधिकारी आरोग्य कर्मचारी याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सहाय्यक संचालक कुष्ठरोग जालना डॉ. सुधाकर शेळके यांनी मार्गदर्शन करताना मंठा तालुक्यातील सर्व जनतेने आपली तपासणी या अभियान कालावधी करावे असे अहवान केले आहे हे अभियान जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ जयश्री भुसारे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे या कार्यशाळेस तालुका आरोग्य अधिकारी डॉ जगन्नाथ कुंडकर वैद्यकीय अधिकारी डॉ शिवाजी निलवर्ण डॉ संदिप हजारे डॉ प्रसन्नजीत वानखेडे आरोग्य सहाय्यक विलास देशमुख आरोग्य सहाय्यक सुजीत या वाघमारे कुष्ठरोग तज्ञ शाम सांवत श्रीमती कुसुम बुधवंत यांच्या सह समुदाय आरोग्य अधिकारी आरोग्य कर्मचारी गटपर्वेतक हजर होते.

## थोडक्यात

### वाळूज महानगरातून दोन महिलांसह तरुणी बेपत्ता

संभाजीनगर: वाळूज महानगर परिसरातून दोन महिला व एक १८ वर्षीय तरुणी बेपत्ता झाली. या विषयी पोलिसांनी सांगितले की, वैष्णवी ज्ञानेश्वर इंगळे (२० रा. वडगाव कोल्हाटी) या महिलेचा पती ११ नोव्हेंबर रोजी सकाळी कंपनीत कामाला गेला होता. दरम्यान महिलेने तिच्या लहान मुलास शेजारी राहणाऱ्या नातेवाईकडे सोडून त्यांना काही एक सांगता ती कुठेतरी निघून गेली. दुसऱ्या एका घटनेत प्रियंका सुनील पांडव (२४ रा. माऊलीनगर, कमळापूर) ही महिला १३ नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास तिच्या आत्याला ब्युटी पार्लरला चालले असे सांगून ती घराबाहेर पडली. मात्र अद्यापपर्यंत ती घरी परत आली नाही. अन्य एका घटनेत पंढरपूर येथील पोलिस कॉलनीत राहणारी पायल आत्माराम गाडेकर ही १८ वर्षीय तरुणी ८ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घरात कोणास काही एक न सांगता घरातून निघून गेली. या तिन्ही घटनांप्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलिस बेपत्ताची नोंद घेण्यात आली आहे.




### वीजेची तार तुटल्याने दोन हेक्टर ऊस जळून खाक

तुळजापूर : धाराशिव तालुक्यातील काकासपूर येथील गोरोबा विठ्ठलराव पाटील यांच्या शेतावरून जाणाऱ्या ३३ केव्ही उच्च दाबाने चालणाऱ्या प्रवाहाची तार तुटल्यामुळे उभ्या असणाऱ्या दोन हेक्टर उसाला मोठी आग लागली आणि यामध्ये १३ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. दोन हेक्टर ऊस, एक लिंबाचे झाड, सात आंब्याची झाडे, १७ पाईप नग, ठिबक सिंचन संच, असे शेतीचे पीक आणि साहित्य या आगीमध्ये जळून खाक झाले. ते ३० किमी उच्च दाबाची तार तुटल्यामुळे ही तार उसामध्ये पडली आणि उसाने पेठ घेतला ही बाब महावितरण कंपनीच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी लोहारा आणि तुळजापूर येथील अग्निशामकच्या गाड्या बोलावून ही आग आटोक्यात आणली आजूबाजूच्या शेतकऱ्यांना देखील याची झळ पोचली आहे. याप्रकरणी महसूल विभागाकडून पंचनामा करण्यात आला आहे. शेतकरी गोरोबा विठ्ठलराव पाटील यांनाही आग लागल्याची बातमी शेजारच्या शेतकऱ्यांनी सांगितले तत्पूर्वी महावितरण कंपनीने हे बाब लक्षात घेऊन प्रशासन आणि अग्निशामक दलाला संपर्क केला असल्यामुळे या शेतकऱ्याचे सात एकर उसाचे क्षेत्र आगीपासून वाचले आहे.



## दोन फरार आरोपींना दीड वर्षाने अटक




छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छावणी पोलिस ठाण्यात दाखल वेगवेगळ्या दोन गंभीर गुन्ह्यांमध्ये गेल्या दीड ते दोन वर्षांपासून फरार असलेल्या दोन आरोपींना गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने अटक केली. विशेष म्हणजे, दोन्ही आरोपी छावणी पोलिस ठाण्याच्या हद्दीतच मजुरी आणि हॉटेलमध्ये काम करत असतानाही संबंधित पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या हाती इतके दिवस कसे लागले नाहीत, असा प्रश्न या कारवाईनंतर उपस्थित होत आहे.

ही कारवाई गुन्हे शाखेचे डीसीपी रत्नाकर नवले, एसीपी वसुंधरा बोरगावकर, पोलिस निरीक्षक गजानन कल्याणकर, सोमनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक नवनाथ पाटवदकर, सिद्धार्थ थोरात, शैलेश ऑस्कर, यशवंत घोबाडे, अमोल मुगळे यांच्या पथकाने केली आहे. छावणी पोलिस ठाण्यात जून २०२४ मध्ये दाखल झालेल्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाच्या गुन्ह्याशी संबंधित आहे. या गुन्ह्यातील आरोपी मुरीद खान शमशेर खान (३७, रा. फुलेनगर, पडेगाव) हा गुन्हा दाखल झाल्यापासून पसार होता. सुरुवातीला परराज्यात पळून गेला. काही दिवसांनी शहरात गुपचूप परत येऊन एका परधर्मीय मुलीशी लग्न केले आणि तो पडेगाव भागात मजुरी करून राहत होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याने आपली संपूर्ण ओळख लपवण्यासाठी वेशभूषा बदलली आणि दुसरे बनावट नावही धारण केले होते. या दरम्यान त्याने काही छोटे चोरीचे गुन्हे केल्याचाही पोलिसांना संशय आहे. तब्बल दीड वर्ष तो पोलिसांना सातत्याने चकमा देत होता, मात्र अखेर गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला बेड्या ठोकल्या.

## महिला पोलिसाची छेड; सहायक पोलिस उपनिरीक्षक निलंबित



परभणी। प्रतिनिधी

पोलिस मुख्यालयातील महिला पोलिस शिपायाची छेड काढल्याप्रकरणी सहायक पोलिस उपनिरीक्षकास निलंबित करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी काढले आहेत.

पोलिस मुख्यालयात कार्यरत महिला पोलिस शिपायाची छेड काढण्याचा प्रकार काही दिवसांपूर्वी पोलिस मुख्यालयात घडला होता. या प्रकरणाची परभणीच्या पोलिस दलामध्ये चर्चा झाली होती, परंतु संबंधित महिला पोलिस शिपायाने आपली बदनामी होईल म्हणून कुठेही या प्रकरणाची वाच्यता केली नव्हती. संबंधित सहायक पोलिस उपनिरीक्षकाने महिला पोलिस शिपायास पुन्हा काम शिकविण्याच्या बहाण्याने छेड काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी संबंधित महिला पोलिस कर्मचाऱ्याने विरोध केला असताना सहायक पोलिस उपनिरीक्षक याने चुकून झाले अशी सारवासारव केली होती. या प्रकरणात पोलिस दलाची प्रतिमा डागाळू नये म्हणून पोलिस अधीक्षक परदेशी यांनी कार्यवाही केली आहे. सहायक पोलिस उपनिरीक्षक विशाल लाड यांच्या निलंबनाचे आदेश पोलिस अधीक्षकांनी काढले आहेत. घटनेने पोलिस दलात खळबळ उडाली आहे.

## दहिफळ खंदारे गणातून प्रा. रणजितराव खंदारे यांनी निवडणूक लढवावी ; ग्रामस्थांचा आग्रह

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील खोराडसावंगी जि.प. गट व पंचायत समिती गण तसेच दहिफळ-खंदारे गण खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित झाला आहे. दहिफळ खंदारे गणातून प्राध्यापक रणजीतराव खंदारे यांनी निवडणूक लढवावी असा आग्रह मतदारांतून होत आहे. यापूर्वी दहिफळ खंदारे पंचायत समिती गणातून अपक्ष म्हणून निवडून आलेले माजी पंचायत समिती सदस्य प्रा. रणजितराव खंदारे यांच्या उमेदवारीसाठी दहिफळ, तळेगाव, गारटेकी, चिखली तांडा, हन वतखेडा, आनंदवाडी, नायगाव येथील ग्रामस्थ आग्रही आहेत. प्रा. खंदारे यांनी पंचायत समिती सदस्य म्हणून कार्यरत असताना गणातील विविध विकासकामे केली आहेत.



यामध्ये हिंदू स्मशानभूमीतील शेड, बौद्ध स्मशानभूमी निवारा शेड, मुस्लिम कब्रस्तानाची संरक्षणभिंत, सभामंडप, बसस्टँड निवाराशेड, हातपंप, आदिवासी वस्तीमध्ये स्वतंत्र पाण्याची टाकी, सिमेंट रस्ते, सौर ऊर्जा आधारित लाइट्स अशी अनेक कामे केली आहेत.

तसेच त्यांच्या कार्यकाळात मतदारसंघात वैयक्तिक लाभ योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी कृषी पाईप, स्प्रिंकलर सेट, पेट्रोल फवारे, चार्जिंग फवारे, बैलगाडी, कडबाकटर यंत्र, पेरणी यंत्र, रोटावेटर, ताडपत्री यांचे वाटप करण्यात आले. विशेष घटक योजनेंतर्गत सिंचनविहिर, इलेक्ट्रिक मोटार संच, ऑइल इंजिन, बैलजोडी, तर महिला-बालकल्याण योजनेंतर्गत ब्युटी पार्लरची खुर्ची, शिवणयंत्र, पिठाची गिरणी यासह अनेक वैयक्तिक योजना लाभार्थ्यांना मिळवून दिल्या. दहिफळ पंचायत समिती गणातून प्रा. खंदारे यांनी निवडणूक लढवावी असा आग्रह मतदारांकडन होत आहे.

## खिचडी वाटप करणे आले अंगलट; दोघांविरोधात गुन्हा दाखल

हिंगोली। प्रतिनिधी

पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने लोकांना खिचडी वाटप करून प्रलोभन दाखविण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये यासाठी निवडणूक विभाग व पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे. त्यासाठी निवडणूक विभागाने पथकांची स्थापना केली असून या पथकांद्वारे उमेदवारांच्या खर्चावर लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान शुक्रवारी शहरातील एका जिनिंग जवळील मोकळ्या मैदानावर नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने लोकांना खिचडी वाटप करून प्रलोभन दाखविण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार संजय तोडेवाले, अशोक धामणे, शेख मुजीब, गणेश लेकुळे, संतोष करे, गणेश वाबळे यांच्या पथकाने शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास पाहणी केली. यावेळी तेथे जमलेल्या लोकांना खिचडी वाटप करून प्रलोभन दाखविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे दिसून आले. जमादार तोडेवाले यांनी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी शेख अनवर शेख रहमान याच्यासह एका महिलेविरुद्ध निवडणुकीच्या अनुषंगाने लोकांना खिचडी वाटप करून प्रलोभन दाखविण्याचा प्रयत्न करणे तसेच लोकसेवकाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करणे या आरोपावरून गुन्हा दाखल केला आहे.



# अजितदादा गटाची मोडतोड आ.क्षीरसागरांच्या पथ्यावर

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या भाजप प्रवेशाने भाजपची ताकद वाढणार

बीड । प्रतिनिधी

नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर अजितदादा गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये जागा वाटपात एकमत न झाल्याने अनेक वर्ष नगराध्यक्ष राहिलेले डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचे चिरंजीव डॉ. योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा गट) चा आपल्या विधानसभा अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असून त्यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी नगर येथे थेट भाजपात प्रवेश घेतला. योगेश क्षीरसागर यांच्या भाजपा प्रवेशाने भाजपाची ताकद बीड शहरात वाढणार असून अजित दादा गटात झालेली मोडतोड ही आ. संदीप क्षीरसागर यांच्या पथ्यावर पडणार असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे. दरम्यान अत्यंत सावधपणे पावले टाकत आ. संदीप क्षीरसागर बीड नगरपालिका निवडणुका लढवताना दिसत आहेत.

गेल्या काही दिवसापासून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा पवार) गटामध्ये धुसपूस चालू होती. राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधानसभेची निवडणूक लढवलेले डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हातात नगरपालिका निवडणुकीची कमांड द्यावी अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र गेवराईचे आ. विजयसिंह पंडित यांचा बीड शहराच्या निवडणुकीमध्ये हस्तक्षेप वाढल्याने आणि जागा वाटपात एकमत न झाल्याने डॉ. योगेश क्षीरसागर यांनी थेट पदाचा राजीनामा देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन थेट भाजपात प्रवेश घेतला. डॉ. योगेश शिरसागर यांच्या भाजपा प्रवेशाने बीड तालुक्यामध्ये भाजपाची ताकद वाढणार असून बीड नगरपालिकेच्या निवडणुकीतही याचे परिणाम दिसणार आहेत. गेल्या अनेक वर्षापासून डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचे बीड नगरपालिकेवर वर्चस्व आहे. आता त्यांचे पुत्र डॉ. योगेश शिरसागर यांनी भाजपकडून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने भाजपची ताकद अपसूकच वाढणार आहे. मात्र ऐनवेळी पान २ वर




### अनेक भाजप विरोधी आमदाराच्या संपर्कात

बीडच्या राजकारणात डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासोबत असलेले मात्र भाजपाला विरोध करणारे अनेक जण आता आ. संदीप क्षीरसागर यांच्या संपर्कात असून मोठ्या संख्येने बीड शहरातील कार्यकर्ते आणि नागरिक आ. संदीप क्षीरसागर यांच्याकडे जातील अशी शक्यता वर्तवली जात आहे.

### ज्यांना वॉर्डच्या सीमा माहित नाहीत त्यांनाही नगरसेवक व्हायचे आहे

सध्या बीड शहरामध्ये नगरसेवक होण्यासाठी अनेकजण इच्छुक असून कुठल्या ना कुठल्या पक्षाकडून आपल्या तिकीट मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्न चालू आहेत. नगरपालिका निवडणुकीसाठी काय तयारी करायची याची कसली माहिती नसताना आपला वार्ड कुठून कुठपर्यंत आहे .त्यात मतदार किती आहेत याची कसलीही माहिती नसताना अनेक जण नगरपालिका निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. केवळ पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकता येतात असा त्यांचा समज असून असे अनेक जण रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत .सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता या मार्गावर चालणारे अनेक जण निवडणूक रिंगणात उतरणार असले तरी ते यशस्वी होतील याची सुतराम शक्यता नाही.

# तलवार घेऊन फिरणाऱ्यास अटक; बीड शहर पोलिसांची कारवाई

बीड । प्रतिनिधी

आज दिनांक १६/११/२०२५ रोजी १४:१५ वा. चे सुमारास अजिजपुरा, नूर मस्जिद च्या बाजूला बीड शहरात तलवार घेऊन फिरत असलेल्या व्यक्तीस बीड शहर पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून चार तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत.




निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांकडून अवैध शस्त्रधारकांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. सदरील व्यक्ती शेरसिंग हिंदू सिंग टाक, वय अंदाजे ५५ वर्ष, रा. वडवणी, ता.वडवणी जि.बीड असून त्याच्याकडून आणखीही अवैध शस्त्रे मिळण्याची शक्यता आहे. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी सर्व पोलिस ठाणे प्रमुखांना निवडणूक काळात अवैध शस्त्रे जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने बीड शहर पोलिसांनी तत्परता दाखवत ही कारवाई केली आहे.

बीड शहर पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोणाकडेही अवैध शस्त्र, तलवार, दारुगोळा किंवा गावठी पिस्तूल असल्याची माहिती असल्यास मो. ७५८८०७७७४ किंवा पीएसआय महेश जाधव मो.९०२१२१६२५६ यावर कळवावे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार व पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय श्री. खेडकर, पीएसआय श्री. महेश जाधव, श्री. गणेश कुमावत तसेच पोलिस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, राम पवार, सुशेन उगले, इलियास शेख यांनी केली आहे.

# आ.विजयसिंह पंडित यांनी हक्काचा पीटीआर मिळवून दिला

गेवराई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी अनेक वर्षांपासून रखडलेला संजयनगर येथील नागरीकांच्या पीटीआरचा प्रश्न कायम निकाली काढला, या भागातील लोकांना हक्काचा पीटीआर मिळवून दिला. जनतेच्या सेवेसाठी कायम शिवछत्र परिवार पुढे राहिलेला आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई शहराचा चेहरामोहरा बदलायचा आहे. त्यासाठी विरोधकांच्या भुलथापांना बळी न पडता घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून माझ्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना नगर परिषदेमध्ये पाठवा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांनी केले.



गेवराई शहरातील प्रभाग क्र.१ मध्ये मतदारांशी सुसंवाद साधताना त्या बोलत होत्या.

प्रचार फेरीला प्रभाग क्र.१ मधील मतदारांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रभाग १ मधील उमेदवार विठ्ठल पवार, भास्कर काकडे, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षा मुक्ताताई आर्दड, शहराध्यक्षा पल्लवी गोगुले, उपाध्यक्षा किरण दाभाडे, योगिता तांबारे, सचिव शिला पैठणे, अनिता काळे, निता बेद्रे, संगीता पान २ वर

# आरशान पठाणचे दमदार शतक; बीडचा ईस्ट झोनवर डावाने व २७० धावांनी विजय

बीड । प्रतिनिधी

बीडच्या संघाने पुणे येथील सी.पी. ग्राउंडवर झालेल्या -१४ मेन्स इन्व्हिटेशन टूर्नामेंट २०२५-२६ च्या सामन्यात ईस्ट झोनचा डावाने व तब्बल २७० धावांनी दणदणीत पराभव करत शानदार विजय मिळवला. या विजयात बीडचा आक्रमक फलंदाज आरशान पठाण याने १२६ चेंडूत १७ चौकारांसह खेचून काढलेल्या १०५ धावांच्या शतकी खेळीने महत्त्वाची भूमिका निभावली. टॉस जिंकत बीडने गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि तो सुरुवातीलाच अचूक ठरला. ईस्ट झोनचा पहिला डाव अवघ्या ७५ धावांत (३४.५ षटक) गडगडला. त्यानंतर बीडने उत्तम फलंदाजी करत ४१० धावांची (६३.२ षटक) भक्कम धावसंख्या उभारली. मल्हार खरवडकर (६८), कुणाल वाघ (६३), कृष्णा गायकवाड (५४) आणि रोहित लोणके (५२) यांनीही महत्त्वपूर्ण खेळी करत संघाला मजबूत बढ़त मिळवून दिली. फॉलोऑन मिळालेल्या ईस्ट झोनचा दुसरा डावही केवळ ६५ धावांत (२३ षटक) संपुष्टात आला. पान २ वर



## पाटोदा तालुक्यात ५२ हजार २२४ शेतकरी फार्मर आयडी नोंदणीपासून वंचित

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील शेतकरी अजूनही फार्मर आयडी पासून वंचित असून शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढून अनुदान प्राप्त शासनाचे करून घ्यावे अन्यथा फार्मर आयडी न काढल्यामुळे तालुक्यातील शेतकरी अनुदानापासून वंचित राहतील तहसील प्रशासनाने याची जागृती करणे आवश्यक असून अजून बऱ्याच शेतकऱ्यांना फार्मर आयडी काय आहे हेच माहीत नाही याची शेतकऱ्यांपर्यंत माहिती होणे आवश्यक असून तहसील प्रशासनाने शेतकऱ्यांपर्यंत जाऊन याची जागृती करावी व शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढण्यास प्रवृत्त करावे पाटोदा तालुक्यात अजूनही बऱ्याच शेतकऱ्यांनी आपला फार्मर आयडी ची नोंद केली नाही फार्मर आयडी हा काढणे अत्यंत आवश्यक असून फार्मर आयडी काढल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचे बरेच लाभ मिळणार आहेत अनुदान पिक विमा भरणे शेतीचे अनेक योजना चे लाभ घेणे या कारणामुळे शक्य होणार आहे फार्मर आयडी मुळे शेतकऱ्यांना शेती विषयक माहिती एकाच ठिकाणी डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहे पाटोदा तालुक्यात अजून बरेच शेतकऱ्यांनी फार्मर आयडीची नोंद केलेली नाही नोंदणी न केलेले शेतकऱ्यांची संख्या ३३८७७ असून या शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढून आपले शासकीय अनुदान प्राप्त करून घ्यावे अन्यथा शासकीय योजना पासून आपण वंचित राहाल.

# विशाल जाजू यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी अंबाजोगाई शहराचे युवा नेतृत्व विशाल विजयकुमार जाजू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष ऍड राजेश्वर चव्हाण यांनी राजकिशोर मोदी यांच्या शिफारशीनुसार विशाल जाजू यांना त्यांची बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती केल्याचे नियुक्तीपत्र राजकीशोर मोदी यांच्या हस्ते नुकतेच देण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ना अजितदादा पवार यांचे व राष्ट्रवादी काँग्रेसचे विचार बीड जिल्ह्यातील तळागाळातील नागरिकांपर्यंत पोचविण्यासाठी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा अध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी सदरील नियुक्ती केली आहे.



विशाल जाजू हे माजी नगराध्यक्ष स्व विजयकुमार जाजू यांचे सुपुत्र असून त्याचा शहरातील पान २ वर

# अंबाजोगाई शहरातील बहुसंख्य नवतरुणाईचा कल राजकिशोर मोदी यांच्याच बाजूने

## दररोज विविध प्रभागातील अनेक नवतरुणांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक जसजशी जवळ येऊ लागली आहे तसा अंबाजोगाई शहरातील नवतारुणांचा ओढा राजकिशोर मोदी यांच्याकडे येऊ लागला आहे. शहरातील विविध प्रभागातील अनेक नवतारुणांचा राष्ट्रवादी काँग्रेस तथा राजकिशोर मोदी यांच्याकडे जाहीर प्रवेश होऊ लागला आहे. या नवतारुण युवा मतदारांच्या मुळे युवा नेते संकेत मोदी तसेच राजकिशोर मोदी यांचा आत्मविश्वास द्विगुणीत होतांना दिसून येत आहे. सर्व नवतरुणाईने एकवटून अंबाजोगाई नगर परिषदेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी तसेच त्याच्या सर्व नगरसेवकाना मोठ्या मताधिक्याने विजयी करून आणण्यासाठीचा विडा त्यांनी उचलला आहे.




अंबाजोगाई शहरात युवा नेतृत्व संकेत राजकिशोर मोदी यांच्या पान २ वर

# अशोक रसाळ यांचे भविष्य उज्वल -प्रितमताई मुंडे

बीड । प्रतिनिधी

बीड भाजपा तालुका अध्यक्ष अशोक रसाळ यांच्या बालाघाट विभागाचे जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजंरसुभा येथे बीड जिल्ह्याच्या मा.दबंग खा.प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते झाले याप्रसंगी मा. खा. मुंडे बोलत असताना म्हणाल्या की भाजपाच्या संघर्षाच्या काळात बालाघाटचे नेते अशोक रसाळ यांनी भाजप पक्षाचे ताकदिने व निष्ठेने काम केले त्यामुळे बालाघाटावर त्यांच्या माध्यमातून भाजप पक्ष बळकट झाला. अशोक रसाळ यांचे भविष्य उज्वल आहे, पक्ष संघटनेच्या व नेतृत्वाच्या विचारावर चालत राहत अशोकराव रसाळ यांनी एक निष्ठेचे एक मूर्तिमंत उदाहरण आज जिल्हाभरात दाखवले आहे असे गौरव उद्गार काढले त्यांच्या कार्याचे कौतुक केले खासदार प्रितमताई मुंडे यांनी त्यांच्या भविष्यात खंबीरपणे पाठीमागे उभा राहणार असा शब्द दिला. याप्रसंगी प्रास्ताविक भाषणात अशोक रसाळ यांनी या कार्यालयाच्या माध्यमातून पंचक्रोशीतील गरजू लोकांचे ताईसाहेबांच्या माध्यमातून कामे करण्यात येतील तसेच या कार्यालयातून ताईसाहेबांची मान उंचावेल असंच काम केलं जाईल असे मनोगत पान २ वर




# राष्ट्रीय महामार्गसाठी भूसंपादन केलेल्या जमिनीचा मावेजा देण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

## तांदळा येथील १५० शेतकऱ्यांना तब्बल दहा वर्षानंतर मिळाला न्याय!

मादळमोही । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तांदळा येथिल १५० शेतकर्यांनी राष्ट्रीय महामार्ग ६१ साठी १९६३ साली अनाधिकृत शेतकर्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करत रस्ता केला, हे अतिक्रमण सरकारने केले असल्याचे वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास कागदपत्री दाखवुन देखिल या प्रकरणी कारवाई न करता उडावा उडवीचे उत्तर देत शेतकर्यावर सतत अन्याय केला मात्र खुद्दा के खर में देर है! लेकिन अधेंर नाही! या म्हणी प्रमाणे उच्च न्यायलय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी आवमान याचिकेवर निकाल देत शासनाने सहा आठवड्यात शेतकर्यांना मावेजा द्यावा, असे आदेश दिल्याने संबधित शेतकर्यांना अखेर न्याय मिळाला आहे या याचिकेत शेतकर्यांच्या बाजुने साईसागर अंबिलवादे, वकील उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी काम पाहिले, निकाल मिळताच तांदळा येथिल साईबाबा मंदिरात गांवकर्यांनी आंनद उत्सव साजरा केला, यावेळी या गांवचे भुमिपुत्र शिर्डी येथिल साईबाबा मंदिराचे मुख्य पुजारी दिलीप शास्त्री सुलाखे यांनी न्यायलय व शासनास पाठपुरावा केला, त्यामुळे १५० शेतकर्यांना तब्बल ६२ वर्षानंतर न्याय मिळाला



न्यायलयाने आवमान याचिकेवर निकाल देताना म्हटले आहे की, तांदळा ता, गेवराई येथिल त्यावेळी राज्य रस्ता म्हणून शेतकर्यांच्या जमिनीवर अनाधिकृत भूसंपादन करत रस्ता केला, त्यानंतर २००४ साली राष्ट्रीय महामार्ग २११ सध्या ६१ हा रुंदी करत पुन्हा अन्याय केला, त्यामुळे शेतकरी कसत असलेल्या जमिनी अनाधिकृत नोटिशी देवून वाढीस संपादन करत अन्याय केला, याचा सविस्तर अभ्यास तांदळाचे भुमिपुत्र तथा शिर्डी येथिल साईबाबा मंदिराचे मुख्य पुजारी दिलीप शास्त्री सुलाखे यांनी शासनाला वेळोवेळी निवेदन देवुन आंदोलन करत ही बाब निदर्शनास आणून दिली, या बाबत केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या सोबत बैठक घेतली, त्या बैठकीत त्यांनी संबंधित शेतकर्यांना मावेजा द्या असे सांगितले आसतांनाही, पान २ वर

# प्रमुख पक्षाचे उमेदवार निश्चित चौरंगी लढत चांगलीच लढणार भाजपाकडून रामचंद्र निर्मळ मैदानात आल्याने निवडणुकीचे चित्र बदलले

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर नगरपरिषद निवडणुकी मध्ये यावेळी अर्जुन गायकवाड सोडता तीनही चेहरे प्रमुख पक्षाकडून नवीन आल्याने नगरपरिषद निवडणुकीतील रंगत चांगलीच वाढली असून ही निवडणूक चौरंगी रंगतदार होणार असे चित्र दिसून येत आहे व भाजपाचे रामचंद्र निर्मळ हे निवडणूक रिंगणात आल्याने आता निवडणुकीचे चित्र वेगळेच दिसून येणार असे शहरात चर्चिले जात आहे.

परिषद निवडणुकीमध्ये महायुतीतील तिन्ही घटक पक्ष हे एकमेका विरुद्ध लढणार हे अगोदरच निश्चित होते . राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून भाजपातून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आलेले बालासाहेब जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे तर एकनाथ शिंदे शिवसेनेकडून शहरात शहर विकास आघाडी कडून अपक्ष निवडणूक लढवण्याची तयारी करणारे सुरेश गवळी यांनी प्रवेश केल्याने ते उमेदवार म्हणून निश्चित आहेत तर भाजपकडून उमेदवार कोण येणार याची चर्चा चांगलीच रंगत होती माजी नगराध्यक्ष डॉ स्वरुपसिंह हजारी यांनी निवडणूक लढवण्यास नकार दिल्याने पक्षाने भाजपात आलेले माधवराव निर्मळ यांचे वडील बंधू व सराफ असोसिएशनचे अध्यक्ष रामचंद्र निर्मळ यांना भाजपाने उमेदवारी दिल्याने निवडणुकीचे चित्र वेगळेच दिसणार आहे महाविकास आघाडीने ही माजी नगराध्यक्ष अर्जुनराव गायकवाड यांना उमेदवारी निश्चित केली आहे त्यामुळे आता हा चौरंगी सामना चांगलाच रंगणार असे चित्र शहरात दिसून येत आहेत व सर्व प्रमुख पक्षाचे उमेदवार निश्चित झाल्याने आता निवडणुकीची रंगत जवळपास स्पष्ट झाली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# संशयित दहशतवादी जुबेर हंगरगेकरच्या मोबाइलमध्ये मोठं सिक्रेट, पाकिस्तान कनेक्शन समोर, चौकशीवेळी उत्तर

पुणे । प्रतिनिधी

संशयित दहशतवादी जुबेर हंगरगेकर याच्या कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये पाकिस्तानचे नंबर आढळल्याची माहिती समोर आली आहे. जुबेर हंगरगेकरच्या मोबाईल मधील कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये ५ आंतरराष्ट्रीय क्रमांक आढळून आले आहेत. हंगरगेकर याच्या जुन्या आणि वापरत्या हँडसेटमध्ये आखाती देशातील नंबर आढळून आले आहेत. जुन्या हँडसेटमध्ये १ नंबर पाकिस्तान, २ नंबर सौदी अरेबिया, १ नंबर ओमान आणि १ नंबर कुवेतचा आहे.वापरत असलेल्या मोबाईलमध्ये १ ओमान आणि ४ सौदी अरेबियाचे नंबर सेव्ह असल्याचं निदर्शनास आलं आहे.

या नंबर बाबत चौकशी केली असता माहीत नसल्याचं हंगरगेकरने चौकशीवेळी केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना म्हटलं आहे. संशयित दहशतवादी जुबेर हंगरगेकर याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. अल कायदा इन इंडियन सबकाँटिनेन्ट (एक्यूआयएस) या दहशतवादी संघटनेच्या समर्थनार्थ जिहादचा प्रसार-प्रचार करून देशाच्या एकता व सुरक्षिततेला धोका निर्माण केल्याच्या आरोपावरून जुबेर इलियास हंगरगेकरला अटक करण्यात आली होती.






हंगरगेकर हा मूळचा सोलापूरचा असून, सध्या कल्याणीनगरमधील एका सॉफ्टवेअर कंपनीत नोकरी करतो. तो विवाहित असून त्याला दोन मुले आहेत, तसेच त्याचे कुटुंब कोंढवा परिसरात राहते. दरम्यान, एटीएस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून हंगरगेकरचा अल-कायदाच्या सदस्यांशी काही संबंध होता का, त्याच्याकडे हे साहित्य का आणि कोणत्या उद्देशाने होते, याचा तपास सुरू आहे. पोलिसांकडून त्याच्या मित्राचीही चौकशी केली जाणार असून, त्याच्याकडील मोबाईल आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तपासणी केली जाईल. तसेच तो इतर कोणत्याही दहशतवादी संघटनेशी संपर्कात होता का, हेही तपासले जात आहे. हे सर्व आंतरराष्ट्रीय क्रमांक झुबेर हंगरगेकर याच्यासाठी महत्त्वाचे असून यातून त्याचं दहशतवादी कनेक्शन समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तथापि, या नंबरबाबत चौकशी केली असता, ते कोणाचे आहेत किंवा त्यांचा कशाशी संबंध आहे, याबद्दल माहिती नसल्याचे उडवाउडवीचे उत्तर हंगरगेकरने दिले आहेत.

एटीएसच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, हंगरगेकरचा अल-कायदाच्या सदस्यांशी संपर्क होता का आणि त्या संपर्काचा उद्देश काय होता, याचा तपास सुरू आहे. त्याच्याकडे अल-कायदाचे साहित्य का आणि कशासाठी ठेवले होते, हेही आम्ही तपासत आहोत. त्याच्या ताब्यात असलेल्या मित्राची चौकशी केली जाणार असून, त्याचे मोबाईल आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तपासणीही केली जाईल. तो इतर कोणत्याही दहशतवादी संघटनेच्या संपर्कात आला होता का, याचाही शोध घेतला जात आहे. दरम्यान, एटीएसने या महिन्याच्या सुरुवातीला शहरातील विविध भागांत सर्च ऑपरेशन राबवले होते. ही कारवाई एका जुन्या आयसिस मॉड्यूलच्या तपासाशी संबंधित होती. त्यावेळी संशयित कट्टरपंथी व्यक्तींवर लक्ष ठेवण्यात आले होते. या मोहिमेदरम्यान १९ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले, मात्र चौकशीनंतर त्यांना सोडण्यात आले. या छाप्यांदरम्यान पोलिसांनी इलेक्ट्रॉनिक उपकरणांसह काही महत्त्वाची कागदपत्रेही जप्त केली होती.

# नवले पुलाचे अपघात थांबणार? मुरलीधर मोहोळ यांनी अधिकाऱ्यांच्या बैठकीत घेतले 'हे' ५ मोठे निर्णय

पुणे । प्रतिनिधी

नवले पूल परिसरातील अपघात थांबविण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना आवश्यक असल्या तरी त्या पूर्ण होण्यासाठी वेळ लागणार आहे. त्यामुळे तातडीने राबवायच्या अल्पकालीन उपाययोजनांची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर निश्चित करण्यात आली असून, या उपाययोजना त्वरित अमलात आणाव्यात, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिले.नवले पूल येथे झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी विविध यंत्रणांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेतली.



या बैठकीस आमदार भीमराव तापकीर, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी संजय कदम, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि इतर उपस्थित होते.या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही उपाययोजनाबाबत सूचना केल्या आहेत. त्यानुसार जांभूळवाडी ते वडगावदरम्यान उपाययोजना केल्या जाणार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील रस्ता सुरक्षा समितीची बैठक निश्चित तारखेनुसार नियमित व्हावी, सेवा रस्त्यांची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने वडगाव पुलाच्या रुंदीकरणाचे काम तत्काळ सुरू करावे, अशा स्पष्ट सूचना मोहोळ यांनी दिल्या.जांभूळवाडी ते वारजे रिंगरोड आणि जांभूळवाडी ते रावेत उन्नत मार्ग हे नवले पुलाजवळील अपघात कमी करण्यासाठीचे मुख्य कायमस्वरूपी उपाय असल्याचे मोहोळ यांनी सांगितले. पीएमआरडीएकडून जांभूळवाडी ते वारजे रिंगरोडचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू असून त्याला गती देण्यात येईल. उन्नत कॉरिडॉरचा डीपीआर पूर्ण झाला असून हा अहवाल लवकरच मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी सादर केला जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# बिरसा मुंडा यांचा संघर्ष हा स्वातंत्र्यलढ्याचा एक तेजस्वी अध्याय -दिलीप वळसे पाटील

मंचर - आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, त्यांच्या जमीन आणि स्वाभिमान रक्षणासाठी बिरसा मुंडा यांनी उभारलेला संघर्ष हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक महत्त्वाचा आणि तेजस्वी अध्याय मानला जातो.असे प्रतिपादन माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी शनिवार, दि.१५ रोजी व्यक्त केले.भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान क्रांतिकारक, आदिवासी समाजाचे प्रेरणास्रोत आणि अन्यायाविरुद्ध लढणारे शूर योद्धा भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालय, मंचर येथे त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.



माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष नवनाथ हुले,कनिष्ठ महाविद्यालय संघटनेचे आंबेगाव तालुक्याचे माजी अध्यक्ष प्रा.अरुण गोरडे,पंचायत समितीचे माजी उपसभापती संतोष भोर, उद्योजक रामदास घोलप, सरपंच नवनाथ निघोट, माजी उपसरपंच रामदास वळसे पाटील, विजय थोरात,सावित्राशेठ थोरात, बाळशीराम ढोमे, निवृत्तीशेठ बोंबे, उद्योजिका ज्योती गोरडे आदीं मान्यवर उपस्थित होते. भगवान बिरसा मुंडा यांची विचारधारा आणि त्यांचे त्यागमय जीवन हे केवळ आदिवासी समाजाच्याच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या उन्नतीसाठी आणि समानतेवर आधारित भारताच्या निर्मितीसाठी सदैव उज्ज्वल मार्ग दाखवत राहील.असे मत यावेळी दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना आदराने नमन केले.

# विवेकाचे शिवधनुष्य उचलण्याची शक्ती या समाजाला मिळावी : प्रा. सुहास पळशीकर

पुणे : अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे अध्वर्यू डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून ज्या अविवेकाने केला त्या समाजात विवेकवादी विचार पेरणे, हे फार आव्हानात्मक कार्य आहे असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे जेष्ठ अभ्यासक प्रा. सुहास पळशीकर यांनी केले. ते पुणे येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठ व डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहा पुस्तिकांच्या लोकार्पण सोहळ्यात बोलत होते. या कार्यक्रमाला अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

ते पुढे म्हणाले, सध्या ज्ञान विरोधी लोक मोकाट आहेत तर ज्ञानमार्गी लोक मुकाट आहेत, अश्या काळात आपण जगत आहोत. कुतूहल जागं करणं, प्रश्न विचारायला लावणं हे विद्यापीठाचे मूलभूत कार्य आहे. मात्र सामाजिक सत्ता व्यवहार यांच्या दबवापुढे विद्यापीठं ज्ञान



निर्मितीपासून दूर जात आहेत. सध्या प्रश्न विचारले की भावना दुखावत आहेत. त्यामुळे विचार मांडण्याचा अवकाश आकुंचन पावत आहे. व्यक्तिगत विवेक आणि सामाजिक विवेक यात फरक का पडत आहे या प्रश्नांला विवेकवाद्यांनी भिडावे लागेल. सोनाली कुलकर्णी म्हणाल्या, मी ज्या क्षेत्रात काम करते, त्याला वेगळं ग्लॅमर आहे, त्याचा उपयोग अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम चार अधिक लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी होईल, या भावनेने मी आज इथे आले आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठाचा प्रसार मी हिरीरीने करेन. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहा पुस्तिकांचा अनुवाद विल्सन कॉलेजमध्ये इंग्रजीचे अध्यापन करणाऱ्या प्रा. राही डहाके यांनी केला आहे. त्या म्हणाल्या डॉ. दाभोलकरांच्या पुस्तिकांचा अनुवाद करताना मला अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. त्यामुळे मी डॉ. दाभोलकरांच्या अन्य साहित्याचा अनुवादही आनंदाने करेन, असं सोनाली कुलकर्णी म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हमीद दाभोलकर यांनी केलं. ते म्हणाले, डॉ. नरेंद्र दाभोलकरांची सत्यशोधक विद्यापीठ सुरू करण्याची इच्छा होती. ही कल्पना अंनिस आता डिजिटल स्वरूपात प्रत्यक्षात आणत आहे. शेतीतज्ञ श्री. अ. दाभोलकर 'मोकाट विद्यापीठ' संकल्पना मांडायचे. जिथे कोणीही येवून शिकू शकतो, प्रश्न विचारू शकतो. या लोकविद्यापीठातही सर्वांना प्रवेश आहे.

# पिंपरीत पीएमपीएमएल बसला अचानक आग; १५ प्रवासी थोडक्यात बचावले!

पिंपरी: पिंपरीतून भोसरीकडे निघालेल्या पीएमपीएमएलच्या बसला रविवारी सकाळी अचानक आग लागून बस जळून खाक झाली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील १५ प्रवासी थोडक्यात बचावले. ही घटना सकाळी पावणे बाराच्या सुमारास लोखंडे कामगार भवनासमोर घडली.

अग्निशामक दलाच्या माहितीनुसार, रविवारी सकाळी पीएमपीएमएलची बस पिंपरीहून भोसरीच्या दिशेने निघाली होती. यावेळी बसमध्ये चालक, वाहक आणि १५ प्रवासी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचा थांबा घेतल्यानंतर बस नेहरूनगरकडे जात असताना लोखंडे कामगार भवनाजवळ बसच्या इंजिनमधून धूर निघत असल्याचे चालकाच्या लक्षात आले. या बसमध्ये यांत्रिक दरवाजे असल्यामुळे दरवाजा उघडण्यास वेळ लागू शकत होता. मात्र चालकाने प्रसंगावधान राखत तातडीने दरवाजे उघडले आणि प्रवाशांना सतर्क करून सर्वांना सुरक्षित खाली उतरवले. प्रवासी बाहेर पडताच बसने पेट घेतला. चालक, वाहक आणि नागरिकांनी जवळच्या हॉटेलमधून अग्निरोधक यंत्र आणून आग विझवण्याचा प्रयत्न केला; मात्र, तरीही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. चालकाने तत्काळ अग्निशामक दलाला माहिती दिली. कळताच अग्निशामक दलाचा एक बंब घटनास्थळी दाखल झाला. जवानांनी शर्तीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली; मात्र तोपर्यंत संपूर्ण बस जळून खाक झाली होती. पेटलेली बस पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी झाली. ज्यामुळे मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

# राजगडावर दगड कोसळून पर्यटक तरुणी गंभीर जखमी; २५ मिनिटांत पुरातत्त्व खात्याची विक्रमी रेस्क्यू मोहीम

**राजगड । प्रतिनिधी**

ऐतिहासिक राजगड बालेकिल्ला परिसरात आज दुपारी झालेल्या अपघाताने पर्यटकांमध्ये खळबळ उडाली. बालेकिल्ल्याजवळ फिरत असताना एका ३१ वर्षीय महिला पर्यटकाच्या डोक्यावर अचानक दगड कोसळला. जखमीचे नाव वर्षा दत्तात्रेय हुंडारे (रा. मुंबई) असे असून तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.



दगड कोसळल्याची घटना अतिशय अचानक घडल्याने काही काळ पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच पुरातत्त्व खात्याचे बापू साबळे आणि त्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी उपलब्ध संसाधनांच्या आधारे जखमी तरुणीवर गडावरच योग्य प्राथमिक उपचार केले. जखमी तरुणीला तातडीने खाली आणण्यासाठी पुरातत्त्व खात्याचे बापू साबळे, विशाल पिलावरे तसेच इतर चार ते पाच सदस्यांनी आव्हानात्मक मार्गावरून वेगवान रेस्क्यू मोहीम राबवली. केवळ २५ मिनिटांच्या विक्रमी वेळेत जखमीला बालेकिल्ल्यावरून खंडोबाच्या मळ्यापर्यंत सुरक्षित आणण्यात आले.रेस्क्यूदरम्यान परिसरातील पोलीस पाटील शिर्के यांनी तातडीचा संपर्क, समन्वय आणि आवश्यक माहिती पुरवून महत्त्वाची मदत केली. घटनेची माहिती मिळताच हवेली आपत्ती व्यवस्थापनचे सदस्य ओंकार ओक यांनी फोनवरून सतत संपर्क ठेवत आवश्यक शासकीय मदत, समन्वय तसेच ॲम्ब्युलन्सची सोय तात्काळ उपलब्ध करून दिली. त्यांच्या या सहकार्यामुळे जखमीच्या पुढील उपचाराकडे वेळेवर गती मिळाली. खंडोबाच्या मळ्यावर आणल्यानंतर जखमीची प्रकृती तपासून तिला खाजगी वाहनातून पुण्यातील रुग्णालयात पुढील उपचारांसाठी रवाना करण्यात आले. तिची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# जुन्नरमधील शाळांना संगणक संचाचे वाटप

आपटाळे । प्रतिनिधी

जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना झेप प्रतिष्ठान यांच्या वतीने मोफत संगणक संचाचे वाटप करण्यात आले. शनिवारी (ता.१५) जुन्नर येथील कोंडाजी बाबा डेरे आश्रम येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा प्रतिकूल परिस्थितीमुळे शैक्षणिक विकास खुंटू नये, संगणक शिक्षणातून बौद्धिक गुणवत्तावाढ आणि कौशल्य विकास व्हावा व आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून या विद्यार्थांची शैक्षणिक प्रगती साधावी या हेतूने संगणक संच दिले असल्याचे संस्थेचे अध्यक्ष विकास धनवडे यांनी सांगितले. यावेळी तालुक्यातील प्राथमिक विद्यामंदिर बारव, बालक मंदिर बारव,न्यू इंग्लिश स्कूल धामणखेल यांसह पारुंडे, इनामवाडी, दत्तनगर, खानापूर, निमदरी, चावंड,शिरोली बुद्रूक, आढी वस्ती, वैष्णवधाम, कुमशेत, ठाकरवाडी धामणी या जिल्हा परिषद शाळांना यावेळी संगणक संच भेट देण्यात आले.

# जैन बोर्डिंग जमीन व्यवहार रद्द; आचार्य गुप्ती नंदीजींची 'वसतिगृह तातडीने सुरू करा' मागणी

पुणे: सेठ हिराचंद नेमचंद जैन दिगंबर बोर्डिंगच्या (जैन बोर्डिंग) जागेचा व्यवहार रद्द झाला आहे. आता बंद झालेले विद्यार्थ्यांचे वसतिगृह आणि मेस लवकर सुरू व्हावी, अशी मागणी जैन मुनी आचार्य श्री गुप्ती नंदीजी यांनी केली. समाजातील सर्व घटकांनी सहकार्य करून पाठिंबा दिल्याने हा व्यवहार रद्द झाल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

मॉडेल कॉलनी परिसरात तीन एकर भूखंडावर सेठ हिराचंद नेमचंद दिगंबर जैन बोर्डिंग व श्री १००८ भगवान महावीर दिगंबर जैन मंदिर आहे. मात्र, काही विश्वस्तांनी २३० कोटींचा व्यवहार करीत ही जागा खासगी बांधकाम व्यावसायिकाला दिली होती. याला जैन समाजाने मोठ्या प्रमाणात विरोध केला होता. या जागेचा वादग्रास्त व्यवहार येत्या पंधरा दिवसांत रद्द न केल्यास मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा आचार्य श्री गुप्ती नंदीजी महाराज यांनी दिला होता. अखेर न्यायालयाने हा व्यवहार रद्द करण्याचे आदेश दिले आहे.




या पार्श्वभूमीवर आचार्य श्री गुप्ती नंदीजी महाराज यांनी शनिवारी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, जागेचा लढा मोठा होता. या लढ्यात आम्हाला सर्वांनी सहकार्य केले. खासदार मुरलीधर मोहोळ यांनी मी केलेल्या आवाहनाला साथ दिली. मुख्यमंत्र्यांनी सहकार्य केले. सर्वांच्या सहकार्यामुळे व पाठिंब्यामुळे जागेचा व्यवहार रद्द झाला आहे. आता येथील बंद असलेले विद्यार्थ्यांचे वसतिगृह आणि मेस सुरू होणे गरजेचे आहे.

ट्रस्टींनी चुका केल्या आहेत, त्यांनी याचे प्रायश्चित्त करणे गरजेचे आहे. ट्रस्टींनी येथील वसतिगृह सुरू करण्याचे आश्वासन देऊन काम सुरू केले आहे. मात्र, वसतिगृहात लाइट नाही, विद्यार्थ्यांसाठीचे बेड, पंखे गायब आहेत. सुरक्षारक्षक असतानाही या वस्तू गायब झाल्या. संतनिवास तोडण्यात आले आहे. ट्रस्टच्या नावे सात एकर जागा असताना जागेवर केवळ तीन एकरच आहे; मग उर्वरित जागा कुठे गेली? याचा शोध घेणे गरजेचे आहे. या सर्व प्रकारांना ट्रस्टीच जबाबदार आहेत. त्यामुळे सध्याचे ट्रस्टी बदलून नवीन ट्रस्टींची नेमणूक करावी, असेही आचार्य श्री गुप्ती नंदीजी महाराज म्हणाले.

# रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण; माळशिरस येथील ग्रामस्थ संतप्त; प्रशासनाचा निषेध!

माळशिरस : सासवड ते यवत मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावर



वारंवार अपघात होत आहेत. मात्र, प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे माळशिरस (ता. पुरंदर) येथील नागरिकांनी शुक्रवारी संतप्त होत प्रशासनाचा निषेध करत खड्ड्यामध्ये वृक्षारोपण केले. माळशिरस गावातून यवतवरून भुलेश्वर घाटमार्गे सासवड ते यवत हा रस्ता जातो. या रस्त्याने माळशिरससह पूर्व भागातील पोंढे, टेकवडी, आंबळे, राजेवाडी वाघापूर, सिंगापूर, वनपुरी, उदाची वाडी, गुरोळी या पूर्व भागातील नागरिकांची सासवड या तालुक्याच्या गावाला जाण्यासाठी नियमित ये -जा चालू असते.

त्याचप्रमाणे सध्या सासवड- सुपे या रस्त्याचे देखील काम चालू असल्याने या मार्गावरील पूर्व भागातील नायगाव, राजुरी, रिसे- पिसे या परिसरातील नागरिकही याच रस्त्याचा सध्या सासवड शहराकडे जाण्यासाठी वापर करतात. या रस्त्यावर मागील काही दिवसात मोठे खड्डे पडले असून, प्रशासनास पत्र व्यवहार करूनही त्याची कोणतीही दखल घेत नाही.

या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी माळशिरस ग्रामस्थांच्या वतीने खड्ड्यात वृक्षारोपण करून याचा निषेध करण्यात आला. या प्रसंगी सदाशिव डोंबाळे, माऊली यादव, गणेश यादव, सुखदेव मराठे, विजय कामठे, संतोष यादव, प्रकाश यादव, दादा यादव, सोमनाथ कामठे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# उद्योजक मनोज तुपे याच्याविरोधात आता फसवणुकीचा गुन्हा

बारामती : एमपीएससीचा अभ्यास करणाऱ्या तरुणीवर बलात्कार केल्याप्रकरणी पुण्यातील हडपसर पोलिस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल झालेल्या बारामतीच्या उद्योजक मनोज तुपे विरोधात सोलापूर जिल्ह्यात मंगळवेढा पोलिस ठाण्यात ५१ लाखांच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. दूध डेअरी चालकाकडून दूध घेत त्याला बिल अदा न करता ही फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दूध डेअरी चालक बंडू सुखदेव लेंडवे (रा. आंधळगाव, ता. मंगळवेढा) यांनी याबाबत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मनोज तुपे, प्रवीण शिवाजी तावरे, बाबुराव नकाते व सुशांत ज्ञानदेव शिर्के या चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. दि. ११ ते २९ जानेवारी २०२२ या कालावधीत ही घटना घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

लेंडवे हे दूध डेअरी चालक आहेत. बाबुराव नकाते (रा. पंढरपूर) यांच्याशी त्यांची व्यवसायातून ओळख झाली. त्याने मनोज कुंडलिक तुपे याच्याशी ओळख करून दिली. त्यानुसार तुपे यांच्या रियल डेअरी बारामती व फॉरच्युन डेअरी, इंदापूर यांच्या मालकीच्या डेअरीत दुध घाला असे




सांगण्यात आले. सन २०२० मध्ये त्यासाठी दूध संकलन अधिकारी प्रवीण तावरे, मॅनेजर सुशांत शिर्के, दूध संकलन अधिकारी विनायक जाधव हे आंधळगावला गेले. तेथे दूधाला अधिकची रक्कम देवू असे सांगितले. पुढे तुपे याच्याशी फिर्यादीने चर्चा केली. बल्क कुलरच्या मशिनरी, दूध तपासणी करण्यासाठी मशिन, जनरेटर देवू असे तुपे याने सांगितले. त्यानंतर फिर्यादीने चार हजार लिटर दूध रिअल डेअरीला दिले. त्यानंतर ते चार ते पाच हजार लिटर दूध पुरवठा करत होते. काही दिवसांनी तुपे यांनी दूध वाढवा, अधिक कमिशन देतो असे सांगितले. त्यामुळे फिर्यादीने दूध संकलन १० ते १२ हजारावर नेले. दूधाचे बिल रिअल डेअरीकडून फिर्यादीच्या खात्यावर जमा होत होते. त्यानंतर तुपे याने फिर्यादीला तुमच्या पत्नीच्या नावे खाते उघडा, त्याला अनुदान मिळते असे सांगितले. त्यानुसार पुढील बिल त्यांच्या पत्नीच्या बँक खात्यावर जमा होवू लागले.११ जानेवारी ते २९ जानेवारी २०२२ या कालावधीत फिर्यादीने १९ टँकरद्वारे १ लाख ७९ हजार ५०८ लिटर दूध रिअल डेअरीला दिले. परंतु त्यांनी त्याची रक्कम दिली नाही. फिर्यादी बंडू लेंडवे यांनी पाठपुरावा केला असता चार दिवसात जमा होईल असे आश्वासन दिले जात होते. पुढे ३० जानेवारी २०२२ पासून दूधाचे रिकामे टँकर त्यांच्याकडे पाठवणे बंद केले गेले. त्यांच्याकडे संकलित दूध खराब होवू लागले. त्यामुळे त्यांनी बारामतीत डायनामिक्स डेअरीला दूध सुरु केले. पुढे रिअल डेअरीचे तावरे, नकाते, शिर्के यांनी फिर्यादीकडे येत आम्ही दिलेल्या मशिनरीचा वापर करायचा नाही, इतरांना दूध विकायचे नाही अशी धमकी दिली. फिर्यादीने त्यांना थकलेली ५१ लाख ५१ हजाराची रक्कम द्या, अशी मागणी केली, परंतु तुम्ही काटेवाल्याशी संगनमत करून दूधाचे वजन वाढवून दिले आहे, ते तपासल्यावर तुमची रक्कम दिली जाईल असे सांगण्यात आले. आम्ही अनेकांना पोलिस ठाण्यात अडकवले आहे, तुम्हालाही अडकवू अशी धमकी देण्यात आली.फिर्यादीने पुढे अनेकदा दूध बिलाची मागणी केली. परंतु तुझ्यावर खोटा गुन्हा दाखल करून तुला जेलमध्ये टाकतो, खतम करतो अशी धमकी देण्यात आली. वारंवार मागणी करूनही पैसे मिळत नसल्याने अखेर फिर्यादीने फिर्याद दाखल केली.